# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० / फाल्गुन ९, १९४१ ( शके )**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(४) ग्रामविकास मंत्री**
**(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(६) महिला व बालविकास मंत्री**
**(७) मृद व जलसंधारण मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७६**

---

### हडपसर (जि.पुणे) येथील बेबी कालवा फुटून झालेले नुकसान

**(१) * १०९० श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील भीमनगरच्या पाठीमागील बेबी कालवा माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात फुटला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार झालेल्या नुकसानीचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, कालवा फुटण्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शासनाने कोणत्या स्वरुपाची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे शहरातील जिल्हा रुग्णालयाच्या आवारात स्वतंत्र महिला रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(२) * ६१९ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील जुने जिल्हा रुग्णालयाच्या आवारात १०० खाटांचे स्वतंत्र महिला रुग्णालय सुरु करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयासाठी सुमारे ३ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून तांत्रिक अडचणींमुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू महिला रुग्णालयाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

१०० खाटांचे स्त्री व बाल रुग्णालय, धुळे या रुग्णालयाच्या दुरुस्तीच्या कामास रु.३६३.८१ लक्ष इतक्या निधीस शासन निर्णय दि.२१.१२.२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर कामास आगामी अधिवेशनामध्ये निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याबाबत

**(३) * ४८४१ श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील महाड (जि.रायगड) हे मध्यवर्ती ठिकाण असून या महामार्गावर वाहन अपघातग्रस्तांचे प्रमाण लक्षात घेता अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावेत म्हणून शासनाने महाड येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारुन त्यासाठी सुमारे साडेचार कोटी रुपये इतका खर्च केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत या ट्रॉमा केअर सेंटरची दुरवस्था झाली असुन या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये वैद्यकीय अधिक्षकांसह ९ अधिकाऱ्यांपैकी, अस्थिरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, भूल तज्ञ, दंतचिकित्सक, शल्यचिकित्सक अशा एकूण ८ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा गेल्या वर्षभरापासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ट्रॉमा केअर सेंटरमधील सर्व तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, महाड आणि ट्रॉमा केअर सेंटर मधील वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्यात आलेली आहेत. तथापि दोन भूल तज्ञ व एक दंत चिकीत्सक ही पदे रिक्त आहेत.

(३) ट्रॉमा केअर सेंटरमधील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे शिराढोण (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रुग्णालय व कर्मचारी निवासस्थान इमारतीच्या बांधकामाबाबत

**(४) * ३६९१ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखडयास मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे शिराढोण (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील नवीन ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारत तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या निवासस्थानासाठी दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ मध्ये रु.१८९५.३३ कोटीच्या कामास मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात सदरहू कामासाठी टोकन म्हणून केवळ १.०० लक्ष इतका निधी देण्यात आला तर सन २०१८-१९ मधील अर्थसंकल्पात या कामासाठी २०.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला असुन बांधकाम विभागाच्या नियमानुसार प्रकल्पाच्या सुमारे ४० टक्के रक्कम जमा झाल्याशिवाय निविदा काढणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयाची मुख्य इमारत, अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या निवासस्थानांसाठी सुसज्य इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासह सदरहू काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मौजे शिराढोण, ता.कळंब, जि.उस्मानाबाद येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारतीच्या बांधकामास रु.१८९५.३३ लक्ष इतक्या रक्कमेस दि.१५.११.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(३) व (४) मौजे शिराढोण, ता.कळंब, जि.उस्मानाबाद येथील ३० खाटांच्या मुख्य इमारत व अधिकारी कर्मचारी निवासस्थानाच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया पुर्ण होवून सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे. सदर कामासाठी सन २०१७-१८ मध्ये रु.०.८० लक्ष, सन २०१८-१९ मध्ये रु.१३.२२ लक्ष व सन २०१९-२० मध्ये रु.६३.०० लक्ष असा एकूण रु.७७.०२ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच, याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील तज्ञ डॉक्टरांच्या रिक्त जागा भरणेबाबत

**(५) * ८९ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.दादाराव केचे (आर्वी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तज्ञ डॉक्टरांच्या ११५२ जागा रिक्त असून विशेषत: विदर्भातील नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया या सहा जिल्हयातील रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांची त्यात फिजिशियन ११ पदे, बालरोग ४० पदे, जनरल सर्जन ६ पदे, स्त्री रोग व प्रसूती तज्ञांची ५० पदे, बधिरीकरण ५६ पदे, अस्थिरोग तज्ञ ४ पदे, नेत्ररोग तज्ञ ४ पदे व इतर तज्ञ व टेक्नेशियन असे २२२ पदे रिक्त असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तज्ञ डॉक्टरांच्या रिक्त पदांमुळे तालुका अंतर्गत असलेले अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र बंद अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गावखेडयांसह शहरातील आरोग्य व्यवस्था सुस्थितीत राहण्याच्या दृष्टीने सदर रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर परिमंडळांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (एस-२३ वेतनस्तर ६७७००-२०८७०० व एस-२० वेतनस्तर ५६१००-१७७५००) मधील पदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| फिजिशियन | ३६ | १८ | १८ |
| बालरोगतज्ञ | ११५ | ६४ | ५१ |
| जनरल सर्जन | ३५ | २३ | १२ |
| स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ | १२० | ६० | ६० |
| बधिरीकरण तज्ञ | ११९ | ५१ | ६८ |
| अस्थिरोग तज्ञ | २९ | २६ | ०३ |
| नेत्ररोग तज्ञ | ३१ | २२ | ०९ |
| एकूण | ४८५ | २६४ | २२१ |

मात्र, आयपीएचएस अंतर्गत विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तात्पुरत्या स्वरूपात तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

नागपूर परिमंडळामधील जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य संस्था व इतर संस्थांमधील एकूण ५३६ मंजूर पदांपैकी ३७८ पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी, ४४ कंत्राटी (बी.ए.एम.एस.) वैद्यकीय अधिकारी व २० बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी असे एकूण ४४२ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात सुरळित आरोग्य सेवा कार्यान्वित आहे.

(३) व (४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (एस-२३ वेतनस्तर ६७७००-२०८७००) मधील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (एस-२० वेतनस्तर ५६१००-१७७५००) मधील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय साधनसामुग्रीसह तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करणेबाबत

**(६) * ३३४ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु होवून अनेक वर्षे लोटली तरी आजतागायत सदरहू रुग्णालयात सी.टी. स्कॅन मशीन,

व्हेनटीलेटर, कार्डियाक मॉनिटर, सोनोग्राफी आणि अन्य अत्यावश्यक साधन सामुग्रीचा अभाव असल्याने सामान्य रुग्णांना अधिकच्या उपचारांसाठी नागपूर येथे पाठविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात बाहय रुग्ण विभागात ३२ प्रकारच्या उपचारा पद्धतीना मान्यता असताना त्या प्रमाणात विभाग सुरु नसून तज्ञ वैद्यकीय अधिकारीही उपलब्ध नसल्याने गरजू रुग्णांना तातडीच्या वैद्यकीय सेवांसाठी खासगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शासकीय महाविद्यालयात सर्व अत्याधुनिक वैद्यकीय साधनसामुग्री आणि तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सदर संस्थेस आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या निधीतून सन २०१८-१९ मध्ये रुपये ४.२२ कोटी व सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये ४.९९ कोटी इतक्या रकमेची यंत्रसामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच संस्थेतील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवाडा खुर्द ते थेरगांव (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपुर) येथील उमा नदीवरील बंधाऱ्याचे काम सुरू करण्याबाबत

**(७) * २७७८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवाडा खुर्द ते थेरगांव (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपुर) येथील उमा नदीवरील बंधा-याचे काम सुरू करण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी अधिक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे मंडळ, चंद्रपूर यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.
(२) जलसंपदा विभागांतर्गत ६०० हे. पेक्षा जास्त सिंचन क्षेत्र असणारे प्रकल्पांचे सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे येतात. सदर पुलवजा बंधारा ६०० हे. पेक्षा कमी क्षमतेचे तसेच बंधारा मंजूर असल्याचे निवेदनात नमूद असल्याने याबाबतची कामे जलसंधारण मंडळाशी संबंधित असल्याने सदर प्रकरण आवश्यक कार्यवाहीकरीता मृद व जलसंधारण अधिकारी, प्रादेशिक जलसंधारण अधिकरी, नागपूर यांचेकडे वर्ग करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील कालवे व पाटचऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(८) * २२२७ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यात मागील दोन ते तीन वर्षांपासून मुबलक सिंचन न झाल्यामुळे व जलसंपदा उपविभाग मलकापूर अंतर्गत येणारे कालवे व पाटचऱ्यांचे देखभाल दुरुस्तीची कामे न झाल्याने त्यांची दुरवस्था झाली असल्याची बाब दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाटबंधारे उपविभाग मलकापूर यांनी सिंचनाची देखभाल दुरुस्तीची कामे न केल्यामुळे रब्बीचा हंगाम सुरू होऊन देखील सदर उपविभाग अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी अद्यापही उपलब्ध होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार जलसंपदा उपविभाग, मलकापूर (जि.बुलढाणा) अंतर्गत येणारी कालवे व पाटचारी दुरुस्तीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करून शेतकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) नाही.

मलकापूर तालुक्यात नळगंगा प्रकल्पाचे लाभक्षेत्र येत असून, सन २०१७-१८ मध्ये नळगंगा प्रकल्पात ४०.५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध झालेला होता. सन २०१७-१८ मध्ये कालव्याचे आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे करून शेतकऱ्यांना कालव्याद्वारे पाणी देण्यात आले होते.

सन २०१८-१९ मध्ये नळगंगा प्रकल्पात १५.३६ टक्के पाणीसाठा असल्याने सिंचन करण्यात आले नसून, कालव्याच्या देखभाल दुरुस्तीची कोणतीही कामे करण्यात आलेली नाहीत.

सन २०१९-२० मध्ये नळगंगा प्रकल्पात नोव्हेंबर-२०१९ मध्ये १०० टक्के पाणीसाठा झाला असून आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

रब्बी हंगाम २०१९-२० करीता आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे पुर्ण करुन लाभधारक शेतकऱ्यांकडून मागणी प्राप्त झाल्यानंतर दि.०१ जानेवारी २०२० पासून कालव्याव्दारे पाणी सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील 'कळमगाव बॅरेज' सिंचन प्रकल्पाबाबत

**(९) * ३०६५ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात ७८ टक्के जंगल असल्याने वन कायद्यामुळे या जिल्हयातील अनेक सिंचन प्रकल्प रखडलेले असल्याने या भागातील नागरीकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जिल्हयातील वैनगंगा नदीवर वन कायद्यात अडसर नसणारे कळमगाव बॅरेज सिंचन प्रकल्प मंजूर झालेले असून त्याची सिंचन क्षमता २०७३४ हेक्टर आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास या सिंचन प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता ३७,२३५.८६ लक्ष रुपयांची सन २०११-१२ च्या दरसूचीनुसार निश्चित करण्यात आलेली असून सदर निधी अद्याप अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू सिंचन प्रकल्प अत्यंत महत्वाचा असल्याने जिल्हयातील वन कायद्यामुळे रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना चालना देण्यासाठी या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही,

या बॅरेजच्या पाणी साठ्यातून कुठलीही उपसा सिंचन योजना प्रस्तावित नसल्याने कळमगांव बॅरेजबाबत मान्यतेबाबत कार्यवाही स्थगित ठेवण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) कळमगांव बॅरेज बाबत प्रशासकीय मान्यता घेणेबाबत पुढील कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यात मंजूरी मिळालेल्या ट्रॉमा केअर सेंटरचे काम सुरु करण्याबाबत

**(१०) * १९२२ डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यात ट्रॉमा केअर युनिटला शासनाकडून माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहा वर्षाचा प्रदिर्घ कालावधी होऊनही अद्याप पर्यंत या नियोजित ट्रॉमा केअर युनिटच्या कामाला सुरुवातही झालेली नसल्याने स्थानिकांनी सदर काम तातडीने सुरु होण्यासाठी वेळोवेळी सनदशिर मार्गाने संबधीतांकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंजूरी मिळालेल्या ट्रॉमा केअर युनिट सुरु न झाल्यामुळे अपघातग्रस्त व इतर रुग्णांची फार मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ट्रॉमा केअर युनिटचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील ट्रॉमा केअर सेंटरची व्यवहार्यता तपासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे राज्यातील ट्रामा केअर सेंटरबाबत धोरण तयार करण्यासाठी तांत्रिक समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून दि.१३.११.२०१९ च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. सदर समितीच्या अहवालावर शासनास अभिप्राय सादर करण्याच्या सूचना संचालक आरोग्य सेवा-१ यांना दि.०८.०१.२०२० च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संचालक स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) अपघातग्रस्त व इतर रुग्णांवर ग्रामीण रुग्णालय वाशी येथे उपचार करुन आवश्यकता वाटल्यास सामान्य रुग्णालय उस्मानाबाद येथे संदर्भित करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हाफकिन महामंडळाकडून औषधांचा व उपकरणांचा पुरवठा वेळेवर होत नसल्याबाबत

**(११) * १०४८ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.गणेश नाईक (ऐरोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकिय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभागातील औषध खरेदीतील गैरव्यवहाराला आळा घालून पारदर्शकता आणण्यासाठी औषध व उपकरणे हाफकिन महामंडळाकडून खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हाफकिन महामंडळाकडून राज्यातील जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, उप-जिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच वैद्यकिय महाविद्यालयात औषधांचा व उपकरणांचा पुरवठा उशीरा होत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार हाफकिन महामंडळाकडून औषधांचा व उपकरणांचा पुरवठा वेळेवर होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२६.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांसाठी लागणाऱ्या औषधे, तद अनुषंगिक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे इ. बाबींच्या दरांमध्ये व मानकांमधील तफावत दुर करुन एकसुत्रता आणण्याकरीता सदर खरेदी व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध महामंडळ यांच्या नियंत्रणाखालील हाफकिन जीव औषध महामंडळ अंतर्गत खरेदी कक्षामार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यातील इंदिरा आवास योजने अंतर्गत देण्यात आलेल्या घरांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१२) * ३३९४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यात आदिवासीवाडी वरील रहिवाशांना सन १९८५ मध्ये इंदिरा आवास योजने अंतर्गत (आताची प्रधानमंत्री आवास योजना) ९०० घरांचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० वर्षे होवून गेलेल्या या घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या आदिवासींनी घरकुलाचा लाभ घेतला आहे त्यांना पुन्हा या योजनेचा लाभ घेता येत नसल्याने मुळातच गरीब असलेल्या या लाभार्थ्यांना पुन्हा नवे घर बांधणे अथवा दुरुस्त करणे शक्य होत नसल्याने मोडकळीस आलेल्या घरामध्येच जिवीताचा धोका पत्करुन राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन मोडकळीस आलेल्या घरांच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोहारा (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील पाझर तलावाचे काम भुसंपादना अभावी सुरू झाले नसल्याबाबत

**(१३) * ४१८९ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारा (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथे जिल्हा परिषद सिंचन विभागामार्फत पाझर तलावाच्या कामाकरीता निधी मंजुर करण्यात आला असताना जमीनीचे भुसंपादन न केल्याने मंजुर तलावाचे काम करण्यात आले नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाझर तलावाचे बांधकाम करण्यात न आल्याने या परिसरामध्ये दुष्काळी परिस्थीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भुसंपादन करुन मंजुर पाझर तलावाचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

सदर गावात मागील ३ वर्षापासून पाणिटंचाई भासली नाही.

(३) व (४) आदिवासी उपयोजने अंतर्गत जिल्हा परिषद यवतमाळ यांनी प्रशासकिय मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी जि.प. यवतमाळ यांनी आदिवासी विकास विभागाकडे निधी मागणी केली आहे. त्यानुसार निधी प्राप्त झाल्यानंतर जमीनीची खरेदी करुन पाझर तलावाचे काम पुर्ण करण्यात येईल.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील येलदरी धरणातून पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(१४) * १०६९ श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील येलदरी धरण सर्वात मोठे धरण असून या धरणाला मोठ्या प्रमाणात छिद्रे पडल्याने अधिक प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणास दहा दरवाजे व १०५६० लिटर इतके क्षेत्र असुन यामुळे २७ गावे ओलीता खाली येत असल्याने या धरणाला गळती लागल्यामुळे या गावातील शेतकरी सिंचना अभावी संकटात सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या येलदरी धरणाच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने सुरक्षेच्या कारणास्तव धरण परिसरात व इतर भागात प्रशासनाने प्रवेश करण्यास सक्त मनाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येलदरी धरणास पडलेली छिद्रे दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

धरणात पाणीसाठा झाल्यानंतर NOF Section दगडी बांधकामामधून अत्यल्प प्रमाणात गळती आढळून आली.

(२) नाही.गळतीचे प्रमाण फार कमी (१ ते २ लिटर प्रतीसेकंद) असून याचा सिंचनावर विपरीत परिणाम होणार नाही.

(३) नाही. गळतीमुळे धरणास व धरण परिसरास कोणताही धोका नाही.

(४) सदरची गळती व प्रकल्पाच्या इतर दुरुस्त्यांसाठी धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा २ व ३ अंतर्गत दुरुस्तीची कामे प्रस्तावित आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१५) * २९३५ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभू उपसा सिंचन योजनेअंतर्गत आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांचे काम गेल्या १५ वर्षापासून रखडले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बंधा-यांचे काम रखडण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या बंधाऱ्यांचे काम तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये आटपाडी तालुक्यातील ३२ को.प. बंधाऱ्यांचा समावेश असून त्यापैकी १२ को.प. बंधाऱ्यांची कामे पूर्ण आहेत.त्यासाठी आतापर्यंत रु.२८.४५ कोटी खर्च झाला आहे.

(२) प्रकल्पाची व्याप्ती मोठी असल्याने, दरवर्षी प्राप्त होणाऱ्या निधीनुसार शिर्षकामे, कालवा कामे व वितरण व्यवस्थेच्या कामांचे नियोजन करून टप्प्याटप्प्याने सिंचनक्षमता निर्मिती करणेत येत आहे.

(३) टेंभू योजनेचा केंद्रशासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत समावेश झाला असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामे टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नवजात बालकांच्या मृत्युत झालेली वाढ

**(१६) * ५२ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित**

**साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्रीमती नमिता मुंदडा (केज), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.मदन येरावार (यवतमाळ), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१८-१९ या काळात १ लाख ६४ हजार १५३ बालकांचे वजन जन्मत:च अडीच किलोपेक्षा कमी असून मुंबई शहर उपनगरात सर्वाधिक कमी वजनाची १६ हजार २५ बाळ जन्मली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार सन २०१८-१९ या वर्षात १६ हजार ५३९ नवजात बालकांच्या मृत्युची नोंद झाली असून या नोंदीमध्ये सर्वाधिक ९६२ नवजात बालकांच्या मृत्युची नोंद मुंबई शहरात झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०१९ ते १५ जानेवारी, २०२० या कालावधीत ११ हजार ७० अर्भक मृत्यू, १० हजार बालमृत्यू व नवजात मृत्यू व १ हजार ८०० माता मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात माता व नवजात बालकांच्या मृत्युची, बालकांचे वजन जन्मत:च अत्यल्प असण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, राज्यातील माता व नवजात बालकांच्या मृत्युचे प्रमाण कमी होणे, बाळंतपण रुग्णालयातच व्हावे याबाबत जागरुकता निर्माण करणे तसेच गर्भधारणेमध्ये मातेच्या आरोग्याची निगा राखणे याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(६) अद्याप उपायोजनांची प्रभावी अमलबजावणी करण्यात येत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

एच.एम.आय.एस. च्या अहवालानुसार राज्यात सन २०१८-१९ या काळात २११७७२ बालकांचे वजन जन्मत:च अडीच किलो पेक्षा कमी असून मुंबई शहर उपनगरात सर्वाधिक कमी वजनाची २२१७९ बाळ जन्मली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

एच.एम.आय.एस. च्या अहवालानुसार राज्यात सन २०१८-१९ या वर्षामध्ये १३०७० नवजात बालकांच्या मृत्युची नोंद झाली असून या नोंदीमध्ये १४०२ नवजात बालकांच्या मृत्युची नोंद मुंबई शहरात झाली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

एच.एम.आय.एस. च्या अहवालानुसार दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीत राज्यात १२१४७ अर्भक मृत्यु, ११०६६ बालमृत्यु व नवजात मृत्यु झाले आहेत. तसेच दिनांक १ एप्रिल, २०१९ ते १५ जानेवारी, २०२० या कालावधीत १०७० इतके मातामृत्यु झालेले आहेत.

(४) माता मृत्युची कारणे - प्रसुती पूर्व उच्च रक्तदाब, प्रसुती पूर्व व पश्चात अति रक्तस्त्राव, प्रसुती पश्चात किंवा गर्भपात पश्चात जंतूदोष व रक्त क्षय ही आहेत.

नवजात बालकांच्या मृत्युची कारणे - अकाली जन्माला आलेले बालक, जन्मत: कमी वजनाचे बालक, जंतु संसर्ग, न्युमोनिया, सेप्सीस, जन्मत: श्वसावरोध / आघात, रेस्पीरेटरी डिस्ट्रेस सिन्ड्रोम इ. आहेत.

बालकांचे वजन जन्मत:च कमी असण्याची कारणे-कमी वयातील प्रसुती, अकाली प्रसुती, बहुविध प्रसुती, दोन बालकांच्या जन्मामध्ये कमी

अंतर, गरोदरपणातील दिर्घकालीन आजार उदा. मधुमेह, जंतुसंसर्ग, कुपोषित गरोदर माता, रक्तक्षय ग्रस्त माता.

(५) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील बालमृत्यु व मातामृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाय योजना करण्यात येतात. :-

१३ व्या वित्त आयोगांतर्गत इन्टेसिफाईड एचबीएनसी (Intensified HBNC), होम बेस्ड केअर फॉर यंग चाईल्ड, Mother Absolute Affection (MAA), जंतनाशक व जिवनसत्व अ मोहिम (De-worming & Vitamin A Drive, ॲनिमिया मुक्त भारत, अतिसार नियंत्रण पंधरवडा (IDCF), ३५ अतिसंवेदनशील तालुक्यांचे संनियंत्रण, आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (Special New Born Care Unilt-SNCU), नवजात शिशु स्थिरकरण कक्ष (New Born Stabilization Unit -NBSU), नवजात शिशु कोपरा (New Born Care Corners -NBCC), बाल उपचार केंद्र (Child Treatment Centres -CTC), पोषण पुनर्वसन केंद्र (Nutrition Rehabilitatioon Centre-NRC), राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, जोखीमग्रस्त कार्यक्षेत्रातील आशां मार्फत अतिसार, न्युमोनिया व सेप्सीस या आजारांचे व्यवस्थापन, भरारी पथक योजना, मातृत्व अनुदान योजना, दाई बैठक योजना, मान्सुनपूर्व उपाय योजना, नियमित लसीकरण, बालमृत्यु अन्वेषण, माता आरोग्य संबंधी योजना, गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थात्मक प्रसुती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) क्षेत्रातील आदिवासींना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) * ५५३ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथे कुपोषणामुळे मोठया प्रमाणात आदिवासी बालकांचा मृत्यु होत असुन आदिवासींसाठी मेळघाटात केंद्र व राज्य शासनातर्फे कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येत असतानाही शासनाची आरोग्यसेवा प्रत्यक्षात आदिवासींपर्यंत पोहोचत नसल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाट परिसरात बनावट डॉक्टर मोठ्या प्रमाणात असल्याने आदिवासी बांधवाची आर्थिक लूट करत असुन सदरहू डॉक्टर योग्य त्या चाचण्या न करताच उपचार करीत असल्याने आदिवासी बांधवाच्या प्रामुख्याने बालकांच्या जीवीताला धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०१८ ते दिनांक ३० मार्च, २०१९ या कालावधीत १९७ अर्भकांचे मृत्यू झाल्याची बाब माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याला कारणीभूत आयसीडीयस, विभाग असल्याचे तज्ञांचे मत असून, गर्भवती महिलांना पोषक आहार मिळत नाही, परिणामी महिलांची प्रतिकार शक्ती कमी होत जाते, त्याबरोबर उपजत बालकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदुषंगाने अर्भक मृत्यूला प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

सुसर्दा, ता.धारणी येथे विना परवानगीने दोन बोगस डॉक्टर वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे आढळून आले आहे.

(३) हे खरे आहे,

दिनांक १ एप्रिल, २०१८ ते ३० मार्च, २०१९ या कालावधीत मेळघाट भागात २४५ अर्भक मृत्यु  झाले आहेत.

(४) हे खरे नाही.

आदिवासी भागात गर्भवती महिलांकरीता डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम योजनेतंर्गत दररोज एकवेळेस चौरस आहार देण्यात येतो. तसेच मेळघाट भागातील गरोदर व स्तनदा मातांना घरपोच आहार अंतर्गत कच्चे धान्य देण्यात येत आहे.

तसेच मेळघाट भागात उपजत बालकांच्या मृत्युचे प्रमाण वाढलेले नाही.

(५) धारणी तालुक्यात दोन बोगस डॉक्टरां विरुध्द तालुका आरोग्य अधिकारी धारणी यांच्या मार्फत पोलीस स्टेशन धारणी येथे दिनांक १५.११.२०१९ रोजी तक्रार नोंदविण्यात आली. धारणी पोलीस स्टेशन येथे दिनांक १५.११.२०१९ रोजी एफ.आय.आर. क्रमांक ४८२ व ४८३ नोंद झाली आहे. तसेच पोलीस विभागामार्फत पुढिल कार्यवाही सुरु आहे.

बालमृत्यू रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडुन राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना खालील प्रमाणे-

• प्रत्येक प्रसुती कक्षात नवजात काळजी कोपरा स्थापन करण्यात आला आहे.

• उपजिल्हा रुग्णालय धारणी येथे विशेष नवजात काळजी कक्ष कार्यरत असुन आजारी नवजात बालकांना उपचार देण्यात येतात.

• इन्टेनसिफाईड एचबीएनसी आशा कार्यकर्ती मार्फत गृहभेटी दिल्या जातात.

• मेळघाट भागातील प्रा.आ.केंद्र स्तरावर बाल उपचार केंद्र कार्यरत आहेत.

• उपजिल्हा रुग्णालय धारणी, ग्रामीण रुग्णालय चिखलदरा व चुर्णी येथे पोषण पुनर्वसन केंद्र कार्यरत असुन गंभीर व तीव्र आजारी कुपोषीत (सॅम) बालकांना दाखल करुन उपचार करण्यात येतात.

• नॅशनल आयर्न प्लस इंनीशिएटीव्ह (NIPI) कार्यक्रमांतर्गत ६ महिने ते ५ वर्ष, ५ ते १० वर्ष, १० ते १९ वर्ष, गरोदर व स्तनदा माता व किशोरवयीन मुलामुलींना लोहयुक्त गोळया व सिरप देण्यात येते.

• नवसंजीवनी कार्यक्रमा अंतर्गत-मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकांमार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक इ. योजना राबविण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्हयातील पोहरादेवी तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्याबाबत

**(१८) * ४७३५ श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील बंजारा समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या पोहरादेवी या परिसराच्या संपूर्ण विकासासाठी शासनाने गेल्यावर्षी १२५ कोटी रुपये रक्कमेचा विकास आराखडा जाहिर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या १२५ कोटी रुपये रक्कमेपैकी केवळ ८ कोटी रुपयेच शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित निधी तातडीने देऊन पोहरादेवी परिसराचा विकास करण्याची मागणी बंजारा समाजाच्या सामाजिक संघटनांनी व तेथील नागरीकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे, तथापि, वाशिम जिल्ह्यातील संत सेवालाल तीर्थक्षेत्र, पोहरादेवी, तीर्थक्षेत्रास दि.२२/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२५.०० कोटी इतक्या निधीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, दि.८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.७५.०० कोटी इतक्या रक्कमेच्या आराखड्यास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. त्यापैकी, रू.६.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. अशाप्रकारे एकूण रु.१००.०० कोटी इतक्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून रु.११.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, वाशिम यांना वितरीत करण्यात आला आहे.

(२) वरीलप्रमाणे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अ.क्र.१ प्रमाणे. तथापि, याप्रकरणी, जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडून वितरीत निधी रु.५.०० कोटीबाबत खर्चाचा सविस्तर अहवाल पाठविण्याबाबत कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत दिला जाणारा पोषण आहार लाभार्थ्यांना मिळत नसल्याबाबत

**(१९) * ७८ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या वतीने टीएचआर अंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील मुले, स्तनदामाता, गरोदरमाता या लाभार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजापूर तालक्यात एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या वतीने टीएचआर अंतर्गत देण्यात येणारा पोषण आहार न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व या तालुक्यात पोषण आहार नियमित मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.
(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राजापूर तालुक्यातील अंगणवाडयांना माहे जानेवारी, २०२० ते फेब्रुवारी, २०२० हया कालावधीचा पुरक पोषण आहाराचा पुरवठा दिनांक ०७.०२.२०२० पर्यंत पुर्ण झालेला आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुऱ्हा-वढोदा, हलखेडा, लालगोटा, बोधवड व घोडसगांव (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) उपसा सिंचन योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(२०) * ३१६० श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुऱ्हा-वढोदा, हलखेडा, लालगोटा, बोधवड व घोडसगांव (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) उपसा सिंचन योजनेचे काम अद्यापपर्यंत अपूर्ण असल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाची सोय नसल्याने शेतपिकांचे नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपसा सिंचन योजनेचे काम अद्यापपर्यंत अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबबतची चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत व सदरहू उपसा सिंचन योजना पूर्णत्वास नेण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :**

(१) कुऱ्हा वढोदा, बोदवड या उपसा सिंचन योजनेची कामे महामंडळाअंतर्गत प्रगतीपथावर आहेत. तसेच मुक्ताईनगर उपसा सिंचन योजनेअंतर्गत घोडसगांव निम्न वितरीकेचे पुर्नस्थापना खर्च निधी मागणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून करण्यात आलेली आहे.

हलखेडा हे गांव कुऱ्हा वढोदा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येते. हलखेडा गावाचे दुसरे नाव लालगोटा असे आहे.

(२) कुऱ्हा वढोदा उपसा सिंचन योजना व बोदवड उपसा सिंचन योजना हे दोन प्रकल्प बांधकामाधीन अवस्थेत असून घोडसगांव निम्न वितरीकेचे राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणामुळे नुकसान झालेले आहे. सदरहू नुकसान भरपाई प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे क्षेत्रिय कार्यालयामार्फत पाठविण्यात आला असून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

नुकसान भरपाई प्राप्त झाल्यानंतर वितरिकेचे पुर्नस्थापनेची व दुरुस्तीची कामे करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाची कामे विहीत वेळेत पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) ग्रामीण रुग्णालयाची श्रेणीवाढ करुन उपजिल्हा रुग्णालय होण्याबाबत

**(२१) * ४७५१ श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे सन १९९१ मध्ये बांधण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाची इमारत अत्यंत जुनी व जीर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नारायणगाव पुणे-नाशिक महामार्गावर असून दररोज तेथे वाहन अपघाताच्या घटना घडत असुन या रुग्णालयामध्ये आयसीयू, बल्ड स्टोरेज व ट्रामा केअर या सुविधा नसल्यामुळे तातडीच्या रुग्ण सेवेअभावी रुग्ण दगावल्याच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयाची श्रेणीवाढ करुन १०० खाटांचे नवीन इमारतीसह सुसज्ज असे उपजिल्हा रुग्णालय बांधावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिक गेल्या दोन वर्षापासून सतत करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्य अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, नारायणगावच्या इमारतीचे बांधकाम दिनांक ३१.०५.१९९१ ला पूर्ण झालेले आहे. सदर इमारतीची देखभाल दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळोवेळी करण्यात येते.

नारायणगाव पोलीस स्टेशन कडून प्राप्त माहितीनुसार पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगाव येथे मागील ३ वर्षात झालेल्या अपघातांची संख्या एकूण ६३ इतकी आहे.

ग्रामीण रुग्णालय, नारायणगाव हे ३० खाटांचे रुग्णालय असल्याने या रुग्णालयात आयसीयू, ब्लड स्टोरेज व ट्रामा केअर या सुविधा उपलब्ध नाहीत. तथापि सदर रुग्णालयापासून १३ कि.मी. अंतरावर उपजिल्हा रुग्णालय, मंचर येथे आयसीयू, ब्लड स्टोरेज व ट्रामा केअर या सुविधा उपलब्ध आहेत. याठिकाणी टोल फ्री क्रमांक १०८ ची सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध असून आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना आवश्यकतेनुसार संदर्भित करुन पुढील उपचार देण्यात येतात.

(४) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालय स्तरावरुन सुरु असून येथे नारायण गांव येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण व आदिवासी जिल्हयातील कुपोषणाबाबत

**(२२) * ८१० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील**

**(कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुपोषणाची नोंद मोबाईल ॲप “कॅस” (CAS) प्रणालीमध्ये नोंद केलेल्या कुपोषित मुलांची संख्या ही बालविकास केंद्रामध्ये करण्यात आलेल्या नोंदीपेक्षा सातपट अधिक असल्याचे एकात्मीक बालविकास सेवा योजना आयुक्तालयाने जाहिर केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ७४६२८ बालके तीव्र कुपोषित तर १९५०४४ बालके मध्यम कुपोषित असल्याची नोंद करण्यात आल्याची बाब ‘कॅस’च्या अहवालानुसार दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ग्रामीण व आदिवासी जिल्हयात कुपोषण निर्मुलनासाठी अनेक योजना राबवूनही कुपोषित बालकांची संख्या वाढतच असून मोठया प्रमाणात बालमृत्यु होत असल्याचे तसेच ठाणे जिल्हयातील दुर्गम व आदिवासी पाडयातील सुमारे ३२७ बालके तीव्र कुपोषित व १७३६ बालके मध्यम कुपोषित असल्याचे माहे मार्च ते नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत केलेल्या सर्व्हेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक जिल्हयातील सुरगाणा, दिंडोरी आणि कळवण तालुक्यातील पोषण पुनर्वसन केंद्र बंद असून सुरगाणा तालुक्यात ४० पेक्षा अधिक कुपोषित बालकांची संख्या असताना या केंद्रात एकही बालक दाखल झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील बालकांमधील कुपोषण निमुर्लन करणे, बंद झालेले पोषण पुनर्वसन केंद्र सुरु करण्याबाबत तसेच आदिवासी बालकांच्या कुपोषणावर विनाविलंब परिणामकारकरित्या मात करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** : (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) होय. हे खरे आहे.

(४) होय. हे खरे आहे.

(५) राज्यातील सॅम बालकांसाठी अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्र सुरु आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये सॅम बालकांना दिवसातुन तीन वेळा EDNF खाऊ घालण्यात येतो. तसेच आरोग्य विभागामार्फत बालकांना योग्य ते औषधोपचार करण्यात येतात.

कुपोषण निर्मुलनासाठी खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत.

१. एकात्मिक बाल विकास सेवा योजनें अंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर स्तनदा मातांना THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२. आदिवासी प्रकल्पांमध्ये अमृत आहार योजना सुरु असून याअंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच ६ महिने ते ६ वर्षवयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी व शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांना १ अंडी देण्यात येतात.

३. राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षणवृध्दीदृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE) रिअल टाईम मॉनिटरिंग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादि उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोराडी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) प्रकल्पाच्या कालव्याची व संरक्षण भिंतीची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२३) * १३६५ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) प्रकल्पाच्या कालव्याद्वारे तीन तालुक्यातील २३ गावांना ३ हजार ७०० हेक्टर एवढे सिंचन होत असताना या कालव्याची साफसफाई व किरकोळ दुरुस्तीची कामे फक्त एक मशिनने होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोराडी प्रकल्पाच्या भिंती झाडाझुडपांनी वेढल्या असून संरक्षण भिंतीची पडझड झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची कामे तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, सुरवातीला एका मशिनद्वारे काम सुरु करण्यात आले होते नंतर, मशिनची संख्या वाढविण्यात येवुन दि.३१/१२/२०१९ पर्यंत साफसफाईची व दुरुस्तीची कामे पुर्ण करण्यात आली आहे.

(२) होय, धरण भिंतीवर झाडे-झुडपे वाढली असुन, धरण माथ्यावरील सुरक्षा भिंतीची (Parapet wall) तुटफुट झाली आहे. तथापि, यामुळे धरणाच्या सुरक्षीततेला कुठलाही धोका निर्माण होत नाही.

(३) कोराडी प्रकल्पाच्या भिंतीवरील झाडे-झुडपे व धरण माथ्यावरील सुरक्षा भिंतीच्या दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक (किंमत रु.५.९२ लक्ष) तयार करण्यात आले आहे. सदर काम अतिरिक्त प्रापणसुचीमध्ये प्रस्तावित करण्यात आले असून सदर काम जुन २०२० पर्यंत करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या आरोग्य विभागातील रुग्णालयांच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(२४) * ५२८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आरोग्य विभागाच्या अनेक रुग्णालयांची बांधकामे निधी अभावी रखडली असून ती पूर्ण होण्यासाठी सुमारे ३७२२ कोटी रुपयांची आवश्यकता असताना वित्त विभागातर्फे आरोग्य विभागास वर्षाकाठी केवळ २५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे दिनांक ११ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिवांच्या अध्यक्षेतखाली झालेल्या बैठकीद्वारे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्याच्या आरोग्य विभागाकडे निधीची कमतरता असल्याने ट्रामा केअर सेंटर व जिल्हा तसेच तालुका पातळीवरील १ हजार २०० कोटींची बांधकामे अर्धवट अवस्थेत असल्याचे व वैदयकीय उपकरणांची खरेदी करणे शक्य होत नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने प्रलंबित प्रकल्पांसाठी अदयापर्यंत किती निधी दिला आहे व किती निधी देणे शिल्लक आहे,

(४) असल्यास, आरोग्य विभागांतर्गत किरकोळ कारणांसाठी अनेक बंद असलेली रुग्णालये व त्यांच्या इमारतींची प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करण्यासाठी तसेच रुग्णालयात लागणाऱ्या उपकरणांसाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) रुग्णालयांच्या चालू बांधकामासाठी सुमारे रु.३९९.२१ कोटी निधी देण्यात आला असून उर्वरीत काम पूर्ण होण्यासाठी सुमारे १२९४.६१ कोटी निधीची आवश्यकता आहे.

(४) विभागाच्या अखत्यारीत प्रलंबित आरोग्य संस्थांची कामे पूर्ण करण्यासाठी नियोजन व वित्त विभागाकडे निधी मागणीबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उंद्री (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथे ग्रामीण रुग्णालय होण्याबाबत

**(२५) * १३०१ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंद्री (ता.चिखली, जि.बुलडाणा) हे खामगाव जालना महामार्गावरील मोठे गाव असून सदर गावाला जोडून अनेक खेडेगाव असूनही तेथे प्राथमिक आरोग्य केंद्राशिवाय कोणतीही आरोग्य सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची श्रेणी वाढ करून ग्रामीण रुग्णालयात मान्यता देऊन तात्काळ सुरु करण्यात यावे अशी अनेक वर्षापासूनची असलेली मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी नागपूर येथे मा.मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकीदरम्यान दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी लेखी पत्राद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सन २०११ च्या लोकसंख्येवर जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालयस्तरावरुन सुरु असून मौजे उंद्री येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर करण्याबाबतच्या मागणीचा निकषानुसार जोड बृहत आराखडयामध्ये समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा व बाल रुग्णालयातील विद्युतीकरणास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) * ६८७ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा व बाल रुग्णालय या १०० खाटांच्या रुग्णालयाची इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून अंतिम विद्युतीकरणाच्या कामासाठी निधी मंजूरीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयातील विद्युतीकरणास निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर विद्युतीकरणाच्या कामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील हेटवणे धरणातून शेती सिंचनाकरीता सोडले जाणारे पाणी वाहून जात असलेबाबत

**(२७) * २०५२ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील हेटवणे धरणातून कालव्याव्दारे शहापाडा डॅमपर्यंत शेतीच्या सिंचना करीता सोडण्यात येणारे लाखो लिटर पाणी कालव्याची दुरुस्ती व कॉंक्रीटीकरण नसल्याने जमीनीत मुरते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्याच्या दोन्ही बाजू मातीच्या असल्याने पाणी जमिनीत मुरते वा वाहून जात असल्याने या सोडलेल्या पाण्याचा सिंचनाकरीता उपयोग होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाण्याचा सिंचनासाठी पूर्ण उपयोग होण्याकरीता सदर कालव्याची दुरूस्ती व कॉंक्रीटीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. तथापि, कालव्यातून सोडलेल्या पाण्याद्वारे सुमारे ९० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे.

(३) हेटवणे प्रकल्पाच्या सिंचन सुरू असलेल्या कालव्याच्या पाणी गळती असलेल्या भागात मातीकाम व अस्तरीकरणाचे काम हाती घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जे.जे. रुग्णालयात केलेल्या क्लिनिकल ट्रायलबाबत

**(२८) * १५८२ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जे.जे. रुग्णालयात एथिकल समितीस पूर्व कल्पना व माहिती न देता क्लिनिकल ट्रायल केल्याने एका रुग्णाचा मृत्यु झाल्याचे व एक रुग्ण अत्यंत गंभीर स्थितीत असल्याचे दिनांक ८ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विदर्भ विकास मंडळाच्या महत्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी दिली नसल्याबाबत

**(२९) * ४४९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विदर्भ विकास मंडळाच्या महत्वपूर्ण प्रस्तावांना अनेक महिन्यांपासून मंजुरी दिली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळांच्या पाच अहवालांना प्रशासकीय मंजुरी न मिळाल्याने जलस्त्रोतांच्या उपशक्तीवर झालेल्या अध्ययनाचा शेष राहिलेला निधी वापरला जाणार नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मंडळाला सहा वर्षानंतर विशेष निधी मिळाला असुन वाटप न झाल्याने उक्त निधीही परत जाण्याची शक्यता असल्याने विदर्भ विकास संदर्भात अध्ययन आणि संशोधनाचे कामकाज ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) व (२) नियोजन विभागाच्या दिनांक १९ मार्च, २०१९ रोजीच्या पत्रानुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित विकास मंडळामार्फत हाती घ्यावयाच्या अभ्यास अहवालांचे प्रस्ताव सादर करताना कोणते मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे, याबाबत सुस्पष्ट मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्या मार्गदर्शक सुचनांनुसार विदर्भ विकास मंडळाकडून अभ्यास अहवालांचे प्रस्ताव सादर झालेले नसल्यामुळे त्यांना मंजुरी देण्यात आलेली नाही.

(३) नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक २३ जुलै, २०१९ नुसार “विशेष निधी” मंजूर करताना, जिल्हाधिकारी यांनी “प्रशासकीय मान्यता” दिलेल्या कामांनाच शासनाकडून निधी वितरित केला जातो.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी, सर्फनाला, नागणवाडी, आंबेओहोळ व उचंगी सिंचन प्रकल्प पुनर्वसन व निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * ३४५३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी, सर्फनाला, नागणवाडी, आंबेओहोळ व उचंगी हे पाच मोठे सिंचन प्रकल्प गेल्या १५ वर्षापासून पुनर्वसन व निधी

अभावी प्रलंबित असून सदरहू प्रकल्प पूर्ण केल्यास जिल्हयातील १४ हजार हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील संदर्भीय प्रकल्पांच्या पुर्नवसनाचे प्रश्न सोडविण्याकरिता प्रकल्पग्रस्तांना लाभ क्षेत्रात जमिनी उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना विशेष आर्थिक पॅकेज देऊन उक्त सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच पाच प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत असलेल्या ३ मध्यम प्रकल्प (धामणी, सर्फनाला व आंबेओहोळ) व २ लघु प्रकल्प (उचंगी, नागणवाडी) अशा नमूद केलेल्या ५ प्रकल्पांची कामे प्रलंबित आहेत. त्यापैकी आंबेओहोळ व उचंगी प्रकल्पांचे काम गेल्या १५ वर्षापासून पुनर्वसन अभावी प्रलंबित आहेत. धामणी, सर्फनाला व नागणवाडी, या प्रकल्पांची कामे पुनर्वसनाच्या अडचणीमुळे व पुरेशा निधी अभावी प्रलंबित आहेत. सदर प्रकल्प पूर्ण केल्यास धामणी म.प्र. (२१०० हे.), सर्फनाला म.प्र. (३७८४ हे.), आंबेओहोळ म.प्र (६३५९ हे.) व नागणवाडी ल.प्र.(१०६५ हे.) उचंगी (२५१९) असे एकूण १५८२७ हे. पिकक्षेत्र ओलीताखाली येणार आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रकल्पग्रस्तांना विशेष आर्थिक पॅकेज देऊन उक्त सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याकरीता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्याकडील नियामक मंडळाच्या बैठकीत ठराव मंजूर करण्यात आले असून त्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांना निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच महसूल विभागाकडून आर्थिक सहाय्य वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

उक्त पाच प्रकल्पांची सद्यस्थिती खालील प्रमाणे :-

**सर्फनाला म.प्र. -** मुख्य मातीधरण ७५% पुर्ण, सिंचन तथा विद्युत विमोचक ७५% पुर्ण, सांडवा खोदकाम २५% काम पुर्ण. प्रकल्पांतर्गत सर्व ५ को.प.बंधारे पूर्ण. मुख्य धरणाची घळभरणी, कटक बांध (Saddle Dam), संधानकातील सांडव्याचे बांधकाम व पुच्छ कालव्याचे खोदकाम इ.काम शिल्लक आहे.

**धामणी म.प्र. -** मुख्य माती धरण ७३% पूर्ण, सांडवा व पुच्छ कालवा यांचे खोदकाम ५०% पूर्ण, धरणाचे विमोचक ९०% पूर्ण, एकूण १० को.प. बंधाऱ्यापैकी ६ को.प. बंधारे पूर्ण असून ४ को.प. बंधाऱ्यांची कामे हाती घ्यावयाची आहेत, त्यापैकी १ को.प.बंधारा चालू वर्षात करणेचे नियोजन आहे.

**नागनवाडी ल.प्र. -** मातीधरणाचे दोन्ही तिरावरील भराव काम, सांडवा पुच्छ कालवा खोदकाम यांचे सुमारे ४५ टक्के इतके काम पुर्ण झाले आहे. सिंचन विमोचकाचे पातनळ काम ९५ टक्के पूर्ण, धरणाखालील ८ को.प.बंधारे पैकी ६ पुर्ण व २ प्रगतीत आहेत. मुख्य धरणाची घळभरणी, संधानकातील सांडव्याचे बांधकाम, पुच्छ कालव्याचे अंशत: खोदकाम व सिंचन विमोचक विहिरीचे काम शिल्ल्क आहे.

**आंबेओहोळ म.प्र. -** मातीधरणाचे दोन्ही तिरावरील भराव काम पूर्ण, सिंचन तथा विदयुत विमोचक - ९५% पूर्ण, सांडवा खोदकाम व संधानकाचे काम ५०% पूर्ण, प्रकल्पांतर्गत एकूण ७ को.प.बं. कामापैकी ६ को.प.बं.ची कामे प्रगतीत. उर्वरीत १ को.प.बं चे काम अंदाजपत्रक स्तरावर, प्रकल्पाची घळभरणी, व उर्वरित अनुषंगिक कामे करून अंशत: पाणीसाठा व सिंचन निर्मितीचे नियोजन आहे.

**उचंगी ल.पा.प्र. -** मातीधरण ८५% पूर्ण, विमोचक - ७५% पूर्ण, सांडवा खोदकाम व बांधकाम २५% पूर्ण, धरणाची गळभरणी व सांडव्याचे उर्वरित बांधकाम शिल्लक आहे. प्रकल्पांतर्गत एकूण १२ को.प.ब ची कामे पूर्ण.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मुंबई शहरामध्ये निर्माण झालेला रक्त पुरवठयाचा तुटवडा

**(३१) * १९०३ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.शेखर**

**निकम (चिपळूण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई शहरात रक्तपुरवठयाची तीव्र टंचाई निर्माण झाली असल्याचे दिनांक १३ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी रक्तपेढयांसह जे.जे.समुह रुग्णालयात ए आणि एबी निगेटिव्ह गटाच्या रक्ताच्या बाटल्याच उपलब्ध नसल्याने, जी.टी.रुग्णालयात कोणत्याच गटाचे रक्त उपलब्ध नसल्याने, सेंट जॉर्जेस रुग्णालयात ए पॉझिटिव्ह गटाव्यतिरिक्त इतर कोणत्याही गटाचे रक्त उपलब्ध नसल्याने रक्ताअभावी शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार रक्तपेढयांकडे रक्ताची किती उपलब्धता आहे याची माहिती ई रक्तकोष या संकेतस्थळावर अपडेट करणे बंधनकारक असतानाही रुग्णालयाकडून तशी माहिती अपडेट करण्यात येत नसल्याचेही माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख** : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) संबधित रुग्णालयांच्या रक्तपेढयांना राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांच्याकडून निर्देश दिल्यानंतर रक्तसाठयाबाबतची माहिती ई-रक्तदोष या संकेतस्थळावर दररोज अद्ययावत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील गायरान, गावठाण व शासकीय जमिनीवरील बांधलेली घरे व प्लॉट नियमित करण्याबाबत

**(३२) * १०९५ श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील गायरान, गावठाण तसेच शासकीय जमिनीवरील बांधलेली भोगवाट्यातील घरे व प्लॉट नियमित करण्याबाबत शासन आदेशानुसार कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, औसा यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी निलंगा उपविभागीय कार्यालयात व दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी औसा तहसील कार्यालयात झालेल्या तालुकास्तरीय सर्व विभागाच्या घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत गट विकास अधिकारी व तहसीलदार यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शासकीय जमिनीवरील भोगवाट्यातील घरे व प्लॉट नियमित करून मालकीहक्कात नोंद करण्याबाबत व या लाभार्थ्यांना त्यांच्या मालकीचा ८ अ वितरीत करण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्यानुसार आज तागायत किती लाभार्थ्यांचे घरे व प्लॉट नियमित करण्यात आलेली आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) “सर्वांसाठी घरे-२०२२” या धोरणातंर्गत राज्य शासनाने प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व इतर राज्यस्तरीय ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांनी निवासी प्रयोजनार्थ केलेली दि.१.१.२०११ पर्यन्तची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे धोरण दि.१६.२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले आहे. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी दि.२०.८.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. राज्य शासनाने निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता येण्यासाठी संगणकीय प्रणाली विकसित केली असून त्यामध्ये सर्व अतिक्रमणांची नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) निलंगा तालुक्यामध्ये टप्पा-१ मध्ये गावठाणातील ३५२, गायरान जमिनीवरील ३५१९ व इतर ६ अशा एकूण ३८७७ अतिक्रमणांची नोंद संगणक प्रणालीवर झालेली आहे.

तसेच औसा तालुक्यामध्ये टप्पा-१ मध्ये गावठाणातील १४३८ गायरान जमिनीवरील ४११२ व इतर ३१३ अशा एकूण ५८६३ अतिक्रमणांची नोंद संगणक प्रणालीवर झालेली आहे. त्यापैकी गावठाणातील ८ अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात आलेली असून इतर अतिक्रमणांच्या संगणकीय प्रणालीवर करण्यात आलेल्या नोंदी तपासून नियमानुकूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) राज्य शासनाच्या अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या धोरणानुसार गावातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे Insitu नियमानुकूल करता येतात. सदर अतिक्रमणे नियमानुकूल करावयाचे झाल्यास अतिक्रमित जागेच्या दुप्पट जागा ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि, राज्यातील गावांमध्ये अशा प्रकारची जागा उपलब्ध होत नसल्यामुळे अशी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास अडचणी येत आहेत.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुग्णालय (मेयो) येथे नवीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव

**(३३) * ४ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुग्णालयाच्या (मेयो) काही इमारतींस सुमारे १०० वर्षे पूर्ण झालेली असून

व्हीएनआयटीने केलेल्या सर्वेक्षणात विभाग क्र ३, ४, ७ व ८ असलेल्या इमारती धोकादायक असल्याचे निष्पन्न झाले असतानाही या इमारतीतून रुग्णसेवा दिली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय वैदकीय महाविदयालय व रुग्णालयाच्या (मेडिकल) टीबी वॉर्ड परिसरातील त्वचारोग विभागाच्या बाहयरुग्ण विभागासमोरील सज्जा (पोर्च) दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास कोसळून २ व्यक्तींचा मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रुग्णालयाच्या इमारतीचे शासनाकडून करण्यात आलेल्या संरचनात्मक लेखा परीक्षण अहवालात काय नमूद करण्यात आले आहे व त्यानुषंगाने मेयो रुग्णालयाच्या आवारात नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या रुग्णालयातील धोकादायक इमारतीत कार्यरत असलेले विभाग तातडीने अन्यत्र स्थलांतरीत करून या इमारती निष्कासित करून त्या ठिकाणी नवीन इमारत उभारण्याबाबत तसेच अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापी धोकादायक परिस्थितीत असलेल्या इमारतीतील कक्ष अन्य इमारतीत स्थलांतरीत करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर या संस्थेचे संरचनात्मक लेखा परिक्षण झाले नसून लेखा परिक्षणांची प्रक्रिया सुरु आहे.मेयो रुग्णालयाच्या आवारात नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) मेयो रुग्णालयातील धोकादायक परिस्थितीत असलेल्या इमारतीतील कक्षाचे संस्थेत उपलब्ध इमारतीत स्थलांतर करण्यात आलेले आहे. नवीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांस दोन लक्ष रुपयांची मदत देण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या विविध मागण्यांबाबत

**(३४) * ८८४ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१९ या दोन महिन्यांचे थकीत वेतन तसेच माहे ऑक्टोबर, २०१९ पासूनच्या वाढीव मानधनाची रक्कम त्यांना अदयाप

अदा करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील एकात्मिक बालविकास सेवायोजनेत काम करणाऱ्या अंगणवाडी महिला कर्मचा-यांनी थकीत मानधन व इतर मागण्यांकरिता जिल्हा परिषदेवर माहे जानेवारी,२०२० मध्ये मोर्चा काढून मागण्यांबाबतचे निवेदन शासनास सादर केले असुन बीड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी विविध मागण्यांसाठी दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी बीड जिल्हा परिषदेवर मोर्चा काढून आपल्या मागण्यांचे निवेदन उप मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिले आहे तसेच बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी आयटक कर्मचारी युनियनच्यावतीने अंगणवाडी सेविकांच्या मागण्यासंदर्भात निदर्शने करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वेतनाची थकीत रक्कम व वाढीव मानधनाची रक्कम अदा करण्यात न आल्यासंदर्भात शासनाचे लक्ष वेधण्याकरिता देशव्यापी संपाचा इशारा कर्मचाऱ्यांच्या संघटनेने शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१), (२), (३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय यांचेकडून उपलब्ध अनुदानातून अमरावती, नागपूर व कोकण विभागातील अंगणवाडी कार्यकर्त्यांचे माहे नोव्हेंबर २०१९ चे मानधन दिनांक ०१/०१/२०२० रोजी केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीद्वारे अदा करण्यात आलेले आहे.

मानधन बाबीवरील पुरेशा अनुदाना अभावी उर्वरित पुणे, नाशिक व औरंगाबाद विभागातील माहे नोव्हेंबर, २०१९ या महिन्याचे मानधन तसेच माहे डिसेंबर, २०१९ या महिन्याचे सर्व विभागातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन प्रलंबित होते. परंतु, सद्य:स्थितीत सर्व विभागातील अंगणवाडी

कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर, डिसेंबर २०१९ व माहे जानेवारी, २०२० चे मानधन केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीद्वारे अदा करण्यात आलेले आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे वाढीव मानधनाचा फरक माहे मार्च, २०२० च्या पहिल्या आठवडया पर्यंत अदा करण्याची कार्यवाही एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय यांचे स्तरावरुन करण्यात येत आहे.

-----------------

## आंभोरा उपसा सिंचन येथील उपसा मोटारी बंद असल्याबाबत

**(३५) * २११२ श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील बहुचर्चित असलेल्या गोसेखुर्द धरणावर शासनाने उपसा सिंचन योजनेवर मोठ्या प्रमाणात खर्च केलेला असतानाही मागील दहा ते पंधरा वर्षा पासून आंभोरा उपसा सिंचन येथील एकूण दहा उपसा मोटारी पैकी पाच उपसा मोटारी बंद असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंभोरा उपसा सिंचन येथील उपसा मोटारी बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याचा परिणाम परिसरातील शेतकऱ्यांना ओलिताची शेती करण्यास होत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही. आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ मधील पंप क्र.१ ते ९ सुरळीतपणे कार्यरत असून त्याच्या सर्व मोटारी सुस्थितीत आहेत. अतिरिक्त असलेला पंप क्र.१० ची दुरुस्ती करण्यासाठी बाहेर काढण्यात आला आहे. आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा क्र.२ मधील सर्व पंप कार्यरत आहेत.

(२) पंप क्र.१० मधील VIBRATION वाढलेले होते व SOLE PLATE मध्ये GAP निर्माण झालेली होती. व पंप OVERHAUL करणे आवश्यक असल्याने त्याच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) अतिरिक्त असलेला एक पंप वगळता इतर सर्व पंप चालु असल्याने शेतीवर कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पात्र अनाथ मुलांना आरक्षणाचा फायदा मिळण्यासाठी शासनाच्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना ७(ब) चे पालन करण्याबाबत

**(३६) * ११ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.महेश बालदी (उरण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे लागू करण्यात आले असून त्यानुषंगाने मार्गदर्शक सूचना दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये जारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना क्र.७(ब) मध्ये नमूद केल्यानुसार, "जर राज्य सेवा मुख्य परीक्षा पार पडली असेल तर मुलाखतीच्या पूर्वी सर्व संबंधित पात्र उमेदवारांना अनाथ प्रमाणपत्र सादर करण्याची संधी देऊन त्यानुसार अनाथ प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतील" या प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील मार्गदर्शक सूचनेचे पालन न करताच, राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१९ चा निकाल दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला असून त्यामुळे बनावट अनाथ प्रमाणपत्रे धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होऊन खऱ्या अनाथ विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बनावट अनाथ प्रमाणपत्रे धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे आधीच तपासून त्यांना आरक्षणासाठी अपात्र ठरविण्यात येत नसल्याने गुणवत्ता यादीतील Cut off वाढत गेल्याने पात्र अनाथ विद्यार्थी पूर्व परीक्षेमधुन बाहेर पडत असल्याने मुलाखतीपर्यंत पोहोचू शकत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनाथ विद्यार्थ्यांची सद्य:स्थितीतील अत्यल्प संख्या विचारात घेता, मार्गदर्शक सूचना ७(ब) चे पालन करुन राज्य सेवा परीक्षेचा अनाथ विद्यार्थ्यांच्या संदर्भातील निकाल फेर जाहीर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** : (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

राज्य सेवा मुख्य परिक्षा २०१९ चा निकाल आयोगाच्या विहित कार्यप्रणालीनुसारच प्रसिध्द करण्यात आलेला आहे. अर्जात केलेल्या दाव्यानुसार मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या सर्व प्रकारच्या दाव्यांच्या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्रे मुलाखतीच्या दिवशी सादर करण्याची मुभा आहे त्यानुसार राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१९ मध्ये अहर्ताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांना मुलाखतीची संधी देण्यात आलेली आहे. तसेच अनाथ आरक्षणासह इतर विविध आरक्षणासंदर्भांत विहित प्रमाणपत्र धारण करणारे व प्रमाणपत्र पडताळणी नंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेतली जाते.

(४) स्पर्धा परिक्षांकरीता मुलाखतीचा टप्प विहित असल्यास मुलाखतीकरीता अहर्ताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या विविध प्रकारच्या आरक्षणाच्या दाव्यांची तपासणी अन्य दाव्यांसोबत मुलाखतीच्या दिवशीच करण्यात येते. सर्व स्पर्धा परीक्षांमधील पुर्व परीक्षा किंवा मुख्य परीक्षेच्या निकालाच्या वेळी कोणत्याही प्रमाणपत्राची तपासणी करण्यात येत नसल्याने उमेदवारांनी अर्जात केलेला दावाच ग्राह्य धरण्यात येतो.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयातील सिंचन व्यवस्था बळकट करण्यासाठी गोसीखुर्द प्रकल्पातून पाणी लिफ्ट करुन खिंडसी जलाशयात सोडण्याबाबत

**(३७) * २१९५ श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील पेंच प्रकल्प भंडारा जिल्हयातील सिंचनाच्या हेतुने तयार करण्यात आला असतानाही तेथील पाण्याचा वापर नागपूर शहराच्या नागरी वसाहती व औद्योगिकीकरणासाठी करण्यात येत असल्याने भंडारा जिल्हयातील डोंगराळ व उंचावर असलेल्या शेतजमीनीला १५ वर्षापासून पाणी मिळत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्हयातील सिंचनाची टंचाई दूर करण्यासाठी याच जिल्हयातून वाहणाऱ्या वैनगंगा नदीवरील गोसीखुर्द प्रकल्पातून पाणी लिफ्ट करुन खिंडसी जलाशयात सोडण्याबाबतची मागणी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने गोसीखुर्द प्रकल्पातून पाणी लिफ्ट करुन खिंडसी जलाशयात सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

नागपूर जिल्हयातील पेंच प्रकल्प हा सिंचनाच्या दृष्टीने तयार करण्यात आला असून प्रकल्पा अंतर्गत जिल्हयातील नागपुर व भंडारा या दोन जिल्हयातील अनुक्रमे ८३०७६ हे. व २१४०० हे. असे एकूण १०४४७६ हे. सिंचन क्षेत्र अंतर्भूत आहे.

त्याअन्वये भंडारा जिल्हयातील २१४०० हे. सिंचन क्षेत्रासाठी प्रवाही पध्दतीने पाणी पुरविण्यात येते. तसेच पेंच प्रकल्पाचे एकूण उपलब्ध पाण्याचे ६८९ दलघमी पाणी सिंचनासाठी व २४३ दलघमी पाणी बिगर सिंचनाकरीता नियोजित करण्यात आलेले आहे.

भंडारा जिल्हयातील डोंगराळ व उंचावर असलेल्या शेतजमीनी पेंच प्रकल्पाच्या संकल्पित लाभक्षेत्रात येत नसल्यामुळे त्यांना पेंच प्रकल्पाचे पाणी तांत्रीक दृष्टया देणे शक्य नाही.

(२) होय.

वैनगंगा नदीचे पाणी लिफ्ट करून रामटेक-खिंडसी जलाशयात वळविणे विषयीची मागणी श्री.राजू माणिकराव कारेमोरे, मा.विधानसभा सदस्य, तुमसर मोहाडी विधानसभा क्षेत्र यांनी मा.मुख्यमंत्री, यांच्याकडे दि.०८/०१/२०२० च्या पत्रान्वये केलेली आहे.

(३) वैंनगंगा नदीवरुन खिंडसी जलाशयात पाणी सोडणेबाबतची मागणी यापुर्वी तत्कालीन लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे पत्र जा. क्र. ४६८४ दि. ०९/०८/२०१७ अन्वये जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे केली होती.

त्या अनुषंगाने वैनगंगा नदीवरील धापेवाडा टप्पा-१ मधुन पाणी उचल करून खिंडसी जलाशयात सोडण्याबाबत मानचित्र अभ्यास अहवाला वरून तयार करण्यात आलेल्या अभ्यासानुसार सदर योजनेची किंमत रू.४०६.९२ कोटी येत असून लाभव्यय गुणोत्तर ०.६५८ येत असल्यामुळे सदर योजना तांत्रिक व आर्थिक दृष्टया अव्यवहार्य आढळल्यामुळे तसा अहवाल जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे क्षेत्रिय स्तरावरुन सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लाडघर (भंडारवाडा) (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत

**(३८) * २८६६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाडघर (भंडारवाडा) (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण मार्ग क्रमांक २४७ या परिसरात पक्क्या स्वरुपात झालेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याकरिता माहे मे व सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान संबंधितांना उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग दापोली यांचेमार्फत नोटीस देऊनही अद्याप सदरहू बांधकाम निष्कासित करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त बांधकामे निष्कासित करण्यासह सदरहू बांधकामास संरक्षण देणा-या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) या प्रकरणी सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे. प्रश्नांकित रस्त्यावरील अतिक्रमण काढून टाकण्याबाबत उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, दापोली तसेच ग्रामपंचायत लाडघर यांच्याकडून वारंवार कळवूनही संबंधीतानी सदरचे अतिक्रमण काढलेले नाही. त्यामुळे सदरचे अतिक्रमण ८ दिवसात स्वखर्चाने काढून टाकण्याबाबत जिल्हा परिषदेने कळविले आहे. याबाबत आवश्यक त्या कायदेशिर बाबी तपासून पोलिस संरक्षणामध्ये सदर अतिक्रमण काढून रस्ता मोकळा करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेमार्फत पोलिस प्रशासन व महसुल विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यामुळे सदरहू बांधकामास संरक्षण देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वडद व तळवली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील नादुरूस्त पाझर तलाव कामांच्या प्रस्तावास होत असलेला विलंब

**(३९) * १२७४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडद व मौजे तळवली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील नादुरूस्त असलेल्या पाझर तलावांच्या दुरूस्तीसाठी क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेमार्फत तपासणी करण्यात येऊन प्रस्ताव सादर करण्याचे आदेश शासनाने दिले असतानाही दोन वर्ष झाले तरी अद्यापपर्यंत हे प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव सादर न होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन प्रस्ताव न देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच प्रस्ताव सादर करुन सदर कामांच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) व (२) अशंत: खरे आहे.

पाझर तलाव वडत ता.गुहागर या योजनेचे रु.८७.१० लक्ष रकमेचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.तथापि, सदर अंदाजपत्रक दुरुस्तीचे अंदाजपत्रका ऐवजी सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयास देण्यात आल्या आहेत. तथापि, सदर काम सन २०२०-२१ च्या दुरुस्ती कार्यक्रमात प्रस्तावित करण्यात येत आहे.

पाझर तलाव तळवली ता.गुहागर योजनेचे काम प्रगतीपथावर असून योजनेच्या सांडवा बारचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व जिल्हयात केमोथेरपी सुविधेसह तज्ञ डॉक्टरांची संख्या वाढविण्याबाबत

**(४०) * ५०४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शांताराम मोरे**

**(भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्करोगाचे वाढते प्रमाण आणि उपचारासाठी मोठ्या शहरात येण्यासाठी रुग्णांना होणारा त्रास कमी करण्यासाठी राज्यात सध्या ११ जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेली केमोथेरपीची सुविधा राज्यातील उर्वरित सर्व जिल्हयात लवकरच सुरु करण्याची घोषणा सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात कर्करोग रुग्णसंख्येच्या तुलनेत तज्ञ डॉक्टरांची संख्या अत्यल्प असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून दरवर्षी लाखो रुग्णांचा कर्करोगामुळे मृत्यु होत असतानाही तीन हजार रुग्णांमागे केवळ एक तज्ञ डॉक्टर असल्याची माहिती या क्षेत्रातील (होप आफ लाईफ) तज्ञांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कर्करोगाचे रुग्ण व मृत्यू यामध्ये अनुक्रमे ११ हजार ३०६ व ५ हजार ७२७ इतकी वाढ झाली असुन संपूर्ण देशाच्या तुलनेत एकटया महाराष्ट्रात ९ टक्के इतके कॅन्सरचे रुग्ण आढळले असल्याचे नॅशनल सेंटर फॉर डिसीज इन्फॉर्मेटिक्स ॲण्ड रिसर्च नॅशनल कॅन्सर रजिस्ट्री प्रोग्रॅम यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) राज्यामध्ये टाटा कर्करोग रुग्णालयाच्या धर्तीवर आणखी तीन रुग्णालयाची गरज असून कर्करोग रुग्णालयाचे हब आणि स्पोक्स अशा दोन मॉडेलची शिफारस राज्यसभेच्या स्थायी समितीने केली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हयात केमोथेरेपीची सुविधा उपलब्ध करुन देणे, कर्करोग निदानासाठी रुग्णालये, तज्ञ डॉक्टरांची संख्या वाढविणे, कर्करोगास अटकाव करणे तसेच समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यात कर्करोग संस्थेच्या तुलनेत तज्ञ डॉक्टरांची संख्या कमी आहे हे खरे आहे. परंतु होप ऑफ लाईफ यांनी याबाबत अभ्यास केला नसल्याचे नमूद केले आहे.

(३) व (४) हे खरे आहे

(५) राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह, हृदयरोग व पक्षघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात राज्य असंसर्गजन्यरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यातील १० जिल्हयांमध्ये जिल्हा रुग्णालय येथे कॅन्सर डे केअर सेंटर (किमोथेरपी युनिट) स्थापन करण्यात आले आहेत. सदर जिल्हयामधील फिजीशियन व स्टाफ नर्स यांना टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबई येथे एक महिन्याचे किमोथेरपी बाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. आता पर्यंत राज्यातील १६ जिल्हयामधील जिल्हा रुग्णालय येथील फिजीशियन व स्टाफ नर्स यांना किमोथेरपी प्रशिक्षण टाटा मेमोरियल

हॉस्पिटल, मुंबई येथे देण्यात आले. उर्वरित २० जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथील फिजीशियन व स्टाफ नर्स यांना सन २०२०-२१ पर्यंत प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. जिल्ह्यामध्ये मागणीनुसार औषधांचा साठा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत २३ जिल्हा रुग्णालय मध्ये कर्करोग रूग्णांची तपासणी केली जाते व कॅन्सर वॉरीअर म्हणुन २३ जिल्हा रुग्णालय मध्ये कार्यरत आहेत व ते कर्करोग रूग्णांना सुविधा पुरवित आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आयुष्यमान भारत योजनेपासून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेप्रमाणे लाभ देणेबाबत

**(४१) * ३९२१ श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ८३ लाख कुटुंबीय "आयुष्यमान भारत" योजनेमध्ये लाभार्थी असूनही सदरहू योजना अद्याप शासनाच्या रुग्णालयांमध्येच लागू करण्यात आली आहे तसेच अनेक बेघर, दारिद्रय रेषेखालील नागरिक, शेतमजूर, अंध, अपंग, दिव्यांग, निराधार, विधवा महिला खूपच गरीब परिस्थिती असूनही या योजनेच्या लाभापासून कमी संख्या असलेले लाभार्थी वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत खासगी रुग्णलये आणि विमा कंपनीशी केलेले करार माहे डिसेंबर, २०१८ मध्ये संपुष्टात आले असून सदर योजनेतून १३०० प्रकारचे ५ लाखापर्यंतचे उपचार मोफत तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून ९७१ उपचार केले जात असून या योजनेमध्ये साम्य असल्याने शासनाने दोन्ही योजना एकत्र केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत तालुका पातळीवर जास्तीचे रुग्णालय समाविष्ठ करणे, सर्व चॅरिटेबल हॉस्पीटल, सर्व शासकीय व खाजगी मेडिकल कॉलेज, महानगरपालिकेचे अद्यावत हॉस्पीटल समाविष्ठ करणे, तसेच खाजगी रुग्णालयातील २५ टक्के राखीव खाटा असून त्यामध्ये वाढ होणेबाबत शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आयुष्यमान भारत या योजनेमध्ये वंचित असलेल्या लाभार्थ्यांची नावे समाविष्ट करणेबाबत तसेच सन २०११ च्या जनगणनेनुसार बरेचशे पात्र लाभार्थी आयुष्यमान भारत योजनेपासून वंचित राहिले असल्याने त्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेप्रमाणे लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ नुसार आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसह दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून एकत्रितरित्या सुरू झाली असून सुरूवातीला शासनाच्या ८३ शासकीय रुग्णालयात चालू होती. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक ०५ मार्च, २०१९ पासून शासकीय व अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये राबविण्यात येत आहे.
(२) विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेस शासनाने दिनांक ३१.०३.२०२० पर्यत मुदतवाढ दिली आहे.

शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ नुसार आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेशी संलग्नीकरण करून दोन्ही योजना राज्यामध्ये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थी कुटुंबास (जे प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थी नसतील) ९९६ वैद्यकीय उपचारांचा व १२१ पाठपुरावा सेवांचा लाभ मिळेल व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थी कुटुंबास वरीलप्रमाणे ९९६वैद्यकीय उपचार व अतिरिक्त २१३ वैद्यकीय उपचार अशा एकूण १२०९ वैद्यकीय उपचारांचा तसेच १८३ पाठपुरावा सेवांचा (महात्मा ज्योतिबा फुले

जन आरोग्य योजनेतील १२१ पाठपुरावा सेवा व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील ६२ पाठपुरावा सेवा) लाभ मिळेल. याबाबत योजनेच्या निविदा प्रक्रिया पुर्ण करुन प्रशासकीय बाबी पूर्ण करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

सद्यस्थितीत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतून १३०० उपचार पद्धतींचा व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतून ९७१ उपचार पद्धतींचा लाभार्थ्यांना लाभ मिळत आहे.

(३) प्रस्तावित सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेमध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये किमान २ रुग्णालये अंगीकृत करण्यात येणार आहेत.

सदर योजनेमध्ये इच्छुक चॅरीटेबल हॉस्पीटल, शासकीय व खाजगी मेडीकल कॉलेज, महानगरपालिकेची रुग्णालये अंगीकरणाचे निकष पूर्ण करत असतील तर रुग्णालय परिक्षणानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्या अध्यक्षतेखालील रुग्णालय अंगीकरण समिती मार्फत रुग्णालय अंगीकरणाबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

एकत्रित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये अंगीकृत रुग्णालयांना किमान २५ टक्के खाटा राखीव ठेवणे बंधनकारक असणार आहे.

(४) केंद्र शासनाकडून सामाजिक, आर्थिक व जातीनिहाय सर्वेक्षण २०११ मध्ये करण्यात आले असून सदर सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र राज्यातील ८३.७२ लक्ष कुटुंबांचा समावेश आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत करण्यात आला आहे.

पात्र शिधापत्रिका धारक कुटुंबांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये लाभ देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टा (ता.चाकूर, जि.लातूर) येथील ग्रामपंचायतीत झालेला गैरव्यवहार

**(४२) * ७५१ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टा (ता.चाकुर, जि.लातूर) येथील ग्रामपंचायतीत सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या वर्षात १४ व्या वित्त आयोगातून एकूण ४६ लाख ६२ हजार ८७० रुपये इतका निधी बँक खात्यात जमा झाला, या निधीतून तेथील सरपंच आणि ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायतीची मासिक मिटिंग न घेता व इतर सदस्यांना न विचारता संगनमताने कामामध्ये सुमारे ४० लाख ७७ हजार रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार ग्रामपंचायतीमधील इतर सदस्यांनी माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गटविकास अधिकारी यांच्याकडे केली असता गटविकास अधिकारी यांनी सदर ग्रामपंचायतीची चौकशी करुन सदरचा चौकशीचा अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) होय, हे खरे आहे, तथापि या प्रकरणी किती रुपयाचा गैरव्यवहार झाला याबाबतची कागदपत्रे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर यांना प्राप्त न झाल्यामुळे याप्रकरणी नव्याने जिल्हा स्तरावरून चौकशी करण्यात येत आहे.

(३) श्री. संजय गंगाधरराव जाधव यांना दि. १३.०१.२०२० रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधित सरपंच यांचे विरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९, कलम ३९(१) किंवा १४(ग) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांचेकडे सुनावणी चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# शेंडगाव (ता.अंजनगाव, जि.अमरावती) येथील कर्मयोगी संत गाडगेबाबा जन्मस्थळ विकास आराखड्याचे कामे निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४३) * १०५८ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंडगाव (ता.अंजनगाव, जि.अमरावती) येथील कर्मयोगी संत गाडगेबाबा जन्मस्थळ असलेल्या ६.७९ कोटी इतक्या किंमतीचा विकास आराखडा प्रशासकीय मान्यतेनुसार मंजूर असूनही अद्यापपर्यंत सदर विकास आराखड्याचे काम प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत गाडगेबाबांच्या समाधी मंदिरासमोरील चार एकरच्या खुल्या जागेत नमूद कामे होणार असुन यामध्ये सदर विकास आराखडयातील ईर्विन रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी स्मृतिभवन इमारतीच्या बांधकामावर दीड कोटींचा निधी त्यावेळेस मंजूर झाला होता, मंजूर झालेल्या निधीमध्ये स्मृतिभवन इमारत उभारण्यात आली असुन अपूऱ्या निधीअभावी त्याचीही कामे अर्धवट अवस्थेत असल्याने याकरिता अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील पर्यटकांना संत गाडगेबाबांच्या कर्मभूमी शेंडगाव चे आकर्षण असून येथे मोठ्या प्रमाणात येणा-या पर्यटकांचे अपू-या मूलभूत सुविधा अभावी गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विकास आराखड्याचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.

तथापि, कर्मयोगी संत गाडगेबाबा जन्मस्थळ असलेल्या शेंडगाव (ता.अंजनगाव, जि.अमरावती) येथील रु.१८६३.३६ लक्ष इतक्या किंमतीच्या

विकास आराखड्यास दि.१४/०२/२०१९ रोजीच्या शासननिर्णयानुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) अशी बाब नाही. सदर बाब शेंडगाव विकास आराखड्याशी संबधित नाही

(३) अंशता खरे असले तरी, शासनाने कर्मयोगी संत गाडगेबाबा जन्मस्थळ विकास आराखडा, शेंडगाव, ता.अंजनगांव, जि.अमरावती या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यास दि.१४/२/२०१९ रोजीच्या शासननिर्णयान्वये रु.१८६३.३६ लक्ष इतक्या रक्कमेच्या कामास प्रशासकीय मंजूरी दिली आहे. तसेच, दि.३१/७/२०१९ रोजीच्या शासननिर्णयान्वये रु.३७३.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) वरीलप्रमाणे. तसेच, जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडून याप्रकरणी अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धारगाव (जि.भंडारा) उपसासिंचन योजना टप्पा १ व २ गोसीखुर्द प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्याबाबत

**(४४) * २४५२ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारगाव (जि.भंडारा) येथील उपसासिंचन योजना टप्पा १ व २ या दोन्ही योजना गोसीखुर्द प्रकल्पाच्या जलाशयावर प्रस्तावित असून धारगाव उपसा सिंचन योजना उस्रागोंदी गावाजवळ प्रस्तावित असल्याने भंडारा व लाखनी तालुक्यातील २२ गावातील ऐकून ३२ हजार हे.आर. शेतजमीन सिंचनाखाली येऊ शकते तर टप्पा २ योजनेमुळे भंडारा लाखनी व साकोली तालुक्यातील ४९ गावातील ८५०० हे.आर. क्षेत्र सिंचना खाली येऊ शकते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यास्तव टप्पा १ योजना गोसीखुर्द प्रकल्पामध्ये अंतर्भूत करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विभाग, नागपूर यांना माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आयोजित बैठकीमध्ये योजना कार्यान्वित करण्यासाठी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यकारी अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी धारगाव उपसासिंचन टप्पा १ व २ योजना गोसीखुर्द प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्यासाठी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तसेच त्यापूर्वी प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर धारगाव उपसासिंचन योजना टप्पा १ व २ योजनेचा विस्तृत डीपीआर तयार करुन मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, धारगाव उपसासिंचन टप्पा १ व २ योजना गोसीखुर्द प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्याबात शासनाने कोणती कर्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुसार या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

धारगाव उपसा सिंचन योजना टप्पा-१ व टप्पा-२ योजना गोसीखुर्द प्रकल्पाच्या जलाशयावर प्रस्तावित असून टप्पा १ योजनेमुळे भंडारा व लाखनी तालुक्यातील २२ गावांतील ३२०० हे. व टप्पा २ योजनेमुळे भंडारा, लाखनी व साकोली तालुक्यातील ४९ गावातील ८५०० हे. आर क्षेत्रात सिंचित करणे प्रस्तावित आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) नाही.

धारगाव उपसा सिंचन योजना टप्पा-१ व टप्पा-२ अन्वेषणाधीन आहेत. सर्वेक्षण व अन्वेषण तथा संकल्पन करून विस्तृत डीपीआर तयार करणे प्रस्तावित आहे.

(५) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र.३८१८ दि.२५.४.२०१९ अन्वये धारगाव उपसा सिंचन योजना टप्पा-१ व २ यांचा स्वतंत्र योजना म्हणून विचार करण्यात यावा व स्वतंत्र प्रशासकीय मान्यता घेण्याबाबत निर्देश देणेत आले असून त्याअनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुठा उजवा कालव्याच्या दौंड ते इंदापूर (जि.पुणे) दरम्यानच्या दुरुस्तीचे काम करण्याबाबत

**(४५) * २९६८ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला कालवा प्रणालीतील मुठा उजवा कालव्यातून दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर (जानाई-शिरसाई उपसा सिंचन योजना), सणसर कालवा येथे सिंचनासाठी पाणी सोडले जात असुन या कालव्याचे दौंड ते इंदापूर (जि.पुणे) दरम्यानच्या अत्यावश्यक दुरुस्तीचे काम रखडले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कालव्याचे दुरुस्तीचे काम रखडण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मुठा उजवा कालव्याची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

दौंड ते इंदापूर दरम्यान नवीन मुठा उजवा कालव्याचे अत्यावश्यक दुरूस्तीचे काम रखडलेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जुना मुठा उजवा कालवा किमी २८ ते ५६, किमी ५७ ते ६८ तसेच किमी ६९ ते ८२ मधील बांधकामे दुरूस्तीसाठी प्रशासकीय मान्यता दिलेली असून सदर कामे अंतिम टप्प्यात आहेत.तसेच जुना मुठा उजवा कालवा किमी ८३ ते ९२, ९३ ते १०१, १०१ ते १०९ मधील बांधकामे दुरूस्ती ,या कामांना महामंडळ स्तरावर बिगर सिंचन पाणीपट्टीच्या उपलब्ध होणाऱ्या ४० टक्के अनुज्ञेय रकमेच्या प्रापण सूची अंतर्गत मान्यता देण्यात आलेली असून सदरची कामे चालू वर्षामध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.तसेच नवीन मुठा उजव्या कालव्याच्या वितरिका क्र. २२,२३,२५,३२,३५ व भिगवण शाखा कालव्याच्या विशेष दुरूस्तीच्या कामांना प्रकल्पाकरिता उपलब्ध असलेल्या

सिंचन पुर्नस्थापना निधीच्या मर्यादेत महामंडळ स्तरावरून नियामक मंडळाची मान्यता घेऊन प्राथम्यक्रमानुसार मान्यता देणेबाबत शासनाने दि.०३/०२/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे येथील भाऊसाहेब हिरे वैद्यकीय शासकीय महाविद्यालयासह जिल्हा रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(४६) * ६२६ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील भाऊसाहेब हिरे वैद्यकीय शासकीय महाविद्यालयासह जिल्हा रुग्णालयात कर्करोग व किडणीच्या आजाराच्या रुग्णांच्या उपचारासाठी एमआरआय मशिन, सीटी स्कॅन मशिन, डायलेसीस, औषधांचा तुटवडा निर्माण होणे इत्यादीसह येथे कोणत्याही प्रकारच्या सोयी उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सोयी-सुविधा व औषधे उपलब्ध होत नसल्याने सामान्य रुग्णांची गैरसाय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांना उपचारासाठी औषधे व सोयीसुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) धुळे संस्थेत एमआरआय यंत्रसामुग्री उपलब्ध नाही ही बाब खरी आहे. तथापी संस्थेत सीटी स्कॅन यंत्रसामुग्री उपलब्ध आहे. असून औषधांचा तुटवडा नाही.

(२) हे खरे नाही.

(३) आवश्यकतेनुसार वित्तीय मर्यादेत औषधी स्थानिक स्तरावरून खरेदी करुन रुग्णसेवा सुरळीत चालू ठेवण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कुष्ठरोगांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत

**(४७) * ९० श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोग मुक्तीसाठी शासनाकडून दरवर्षी १२३० कोटींचा खर्च केला जात असतानाही सार्वजनिक आरोग्य विभागाने राबविलेल्या कुष्ठरुग्ण शोध मोहिमेत राज्यातील ३५ जिल्हयांत ७ हजार ११८ नवे कुष्ठरुग्ण आढळून आल्याची माहिती माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुष्ठरोगाचे सर्वाधिक रुग्ण विदर्भातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर व गोंदिया या ४ जिल्हयात असून ठाणे शहरासह कल्याण, नवी मुंबई, उल्हासनगर व मीरा-भाईंदरसारख्या शहरांमध्ये मायक्रो बॅक्टेरिअम लेप्री या जंतूची पॉवर वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात इतक्या मोठया प्रमाणात कुष्ठरोग रुग्ण आढळल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, कुष्ठरोग निदान आणि त्याचे निवारण करणाऱ्या यंत्रणेतील रिक्त पदे व आवश्यक सोयींचा अभाव याचा आढावा घेऊन त्या दूर करणे तसेच कुष्ठरुग्णांची वाढती संख्या रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात दि.१३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर, २०१९ या कालावधीत राबविलेल्या शोधमोहिमेत ६११६ नविन कुष्ठरुग्ण शोधण्यात आले. माहे एप्रिल,२०१९ ते डिसेंबर,२०१९ या कालावधीत राज्यामध्ये १३,८३५ नविन कुष्ठरोगाचे रुग्ण शोधण्यात आले. या सर्व रुग्णांना बहुविध औषधोपचार सुरु केलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल,२०१९ ते डिसेंबर,२०१९ या कालावधीत राज्यात कुष्ठरोगाचे सर्वाधिक नविन रुग्ण अनुक्रमे चंद्रपूर (१३६२), पालघर (१०६९), नाशिक (८७७), गडचिरोली (८७५) या चार जिल्हयात आहेत. भंडारा जिल्हयामध्ये (३९४) व गोंदिया जिल्हयामध्ये (३४७) नविन कुष्ठरुग्ण आहेत. नवी मुंबई वगळता ठाणे शहरासह कल्याण, उल्हासनगर व मीरा-भाईंदरसारख्या शहरांमध्ये सन २०१८-२०१९ च्या तुलनेमध्ये सन २०१९-२०२० डिसेंबर अखेर मध्ये नवीन शोधलेल्या कुष्ठरुग्णांचे प्रमाण कमी झाले आहे. तसेच मायक्रो बॅक्टेरिअम लेप्री या जंतुची पावर वाढली असल्याचे आढळून आले नाही.

(३) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाच्या राज्य व जिल्हास्तरीय सभेमध्ये कार्यक्षेत्रनिहाय नियमितपणे आढावा घेतला जातो व जिल्हास्तरावरुन प्रत्यक्ष भेटीद्वारे पडताळणी केली जाते. त्यामुळे वेगळी चौकशी केली जात नाही. सदर शहरामध्ये स्थलांतरीत लोकसंख्येचे प्रमाण, दाट लोकवस्ती व दीर्घ कालावधीचा अधिशयन काळ यामुळे कुष्ठरोगाचे रुग्ण आढळत आहेत.

(४) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत तांत्रिक पाठबळासाठी मंजूर असलेल्या १०९ अवैदयकीय पर्यवेक्षक पदांपैकी ५२ पदे भरलेली आहेत व ४८७ अवैद्यकीय सहाय्यक पदांपैकी ३११ पदे भरलेली आहेत. ३६ अवैद्यकीय सहायक पदांच्या भरतीची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे.

कुष्ठरोग कार्यक्रमाचे सर्वसाधारण आरोग्य सेवेत एकत्रिकरण झाले आहे. आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविकेमार्फत घरोघरी भेटी देऊन संशयित रुग्ण शोधले जातात व या रुग्णांचे निदान वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेकडून निदान निश्चिती झालेल्या कुष्ठरुग्णांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणले जाते.

• स्वयंसेवी संस्थाना अनुदान.

• विविध माध्यमांद्वारे शाळांमध्ये कुष्ठरोगाविषयीची लक्षणे व उपाययोजनेबाबत माहीती देवून जनप्रबोधन व आरोग्य शिक्षण देण्यात येत आहे.

• संशयीत रुग्ण शोध मोहीमेअंतर्गत निदाननिश्चिती अंती रुग्णांना बहूविध औषधोपचार व सहवासितांना रिफांम्पीसीन या गोळीचा एक मात्रा दिला देण्यात येतो.

• सर्व शासकीय व निमशासकीय रुग्णालयांमध्ये मोफत निदान व बहूविध उपचार दिला जातो.

• सर्व संस्थांमध्ये पुरेसा औषधसाठा उपलब्ध करून देण्यात येतो

• कुष्ठरुग्णांना विकृती प्रतिबंध व वैद्यकीय पुनर्वसनाच्या सेवा (एमसीआर चप्पल, गॉगल्स भौतिकोपचार, सेल्फ केअर किट इ.) मोफत दिल्या जातात.

• कुष्ठरुग्णांची पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील हूमन सिंचन प्रकल्पाबाबत

**(४८) * २७८८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यात सिरकाडा गावाजवळ हूमन नदीवर प्रस्तावित सिंचन प्रकल्प अद्याप अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची मागणी विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

हूमन प्रकल्पामुळे १९२५.५५ हे.वनजमीन बाधीत होत असल्यामुळे वनकायदा १९८० अतंर्गत वनजमीनीची अंतिम मान्यता नसल्यामुळे प्रकल्पाची कामे सन १९८४-८५ पासुन ते आजपावेतो बंद आहे.

(२) होय.

(३) हूमन प्रकल्पामुळे बाधीत होणारे काही वनक्षेत्र ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे बफर झोनमध्ये समाविष्ट आहे, त्यामळे सदर प्रकल्पास वन विभागाची अंतिम मान्यता प्राप्त होण्याच्या दृष्टीने हूमन नदी प्रकल्पास आवश्यक १९२५.५५ हे.वनक्षेत्र वळते करण्याच्या अनुषंगाने राज्य वन्यजीव मंडळ व राष्ट्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त होण्याचे दृष्टीने अभ्यास करण्यासाठी दि.०१/१२/२०१६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीची बैठक प्रधान सचिव (वने) यांचे अध्यक्षतेखाली दि.०५/०३/२०१९ व दि.१३/०१/२०२० रोजी संपन्न झाली असुन दि.२४/०१/२०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षते खाली बैठक संपन्न झालेली आहे. सदर बैठकांमध्ये प्राप्त झालेल्या निर्देशानुसार आवश्यक अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यात ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबत

**(४९) * २२४७ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यात सुमारे १०२ लहान-मोठ्या गावांची व्याप्ती असतानाही येथे अद्याप ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदुरा येथे ग्रामीण रुग्णालय नसल्याने नांदुरा शहर व तालुक्यातील गोरगरीब गरजू नागरिकांना वैद्यकीय उपचारासाठी बुलढाणा अथवा अकोला येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने नांदुरा येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नांदुरा येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्यास शासन निर्णय ३ जुन २००९ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. दोन्ही रुग्णालयाच्या इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

नांदुरा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उपलब्ध असुन नांदुरा पासुन २० कि.मी. अंतरावर खामगाव येथे सामान्य रुग्णालय व ट्रॉमा केअर उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शहरात अवैधरित्या गर्भपात करण्यात येत असल्याबाबत

**(५०) * ११३३ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील आंबेडकर चौकामधील सात्विक क्लिनिकमध्ये अवैधरित्या गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून शहरात मोठ्या प्रमाणात गर्भपाताच्या किटची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अकोला येथील कुंभारी रोडवरील शिवणी येथे एक महिला डॉक्टर आपल्या सहकाऱ्याच्या मदतीने अवैधरित्या गर्भपात करीत असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली असून या प्रकरणी पोलिसांनी तीन नागरिकांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी अवैध गर्भपात करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय, अकोला शहर पोलीसांमार्फत एक (BHMS) वैद्यकीय व्यावसायीक, त्यांचा एक साथीदार व नर्स अशा तीन आरोपींना दि.२८.१२.२०१९ रोजी अटक करुन आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन रामदास पेठ अकोला येथे अप क्र.४२०/१९ कलम ३१२, ३१३, ४१९, ४२०, ३३६, २०१, ३४ भा.दवि. सहकलम ६ औषधी नियंत्रण अधिनियम, १९५९ सह कलम १८ (सी), कलम २७ क (२) औषधी द्रव्ये व सौंदर्य प्रसादन अधिनियम १९४० व वैद्यकीय गर्भपात अधिनियम १९७१ च्या कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.बी.जी छाया उपजिल्हा (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) रुग्णालयात चुकीचे इंजेक्शन दिल्याबाबत

**(५१) * ३४२४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बी.जी छाया उपजिल्हा रुग्णालय (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे दाखल करण्यात आलेल्या रुग्णांना चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे बारा रुग्णांची प्रकृती बिघडल्यामुळे रक्ताच्या उलट्या होणे, श्वास घेण्यास त्रास होणे आदि त्रास उद्‌भवल्याची घटना दिनांक २ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रुग्णालयास दोन वर्षांपुर्वी राज्य शासनाने उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा दिला असुन ४८ कर्मचा-यांची विविध पदांवरील भरती, ५० खाटांची व्यवस्था, उपचारासाठी अत्याधुनिक यंत्र व साहित्य पुरविण्यात येणार होते तथापि, गेल्या तीन वर्षात कोणतीही मदत व वैद्‌यकीय सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

कै.बी.जी छाया उपजिल्हा रुग्णालय, अंबरनाथ (जि.ठाणे) येथे सेट्रीयाझोन इंजेक्शन दिल्यानंतर १२ रुग्णांना उलट्या व मळमळ झाली हे खरे आहे, परंतु चुकीच्या इंजेक्शनमुळे झालेले नाही.

(२) हे खरे नाही.

कै.बी.जी छाया उपजिल्हा रुग्णालय, अंबरनाथ हे ५० खाटांचे रुग्णालय असून निकषानुसार एकूण ४८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २३ नियमित पदे असून १८ पदे भरण्यात आलेली आहेत. काल्पनिक कुशल २१ पदे व अकुशल ४ पदे भरण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. रुग्णालयास

एक्सरे मशिन, ईसीजी मशिन, सेंट्रीफुज मशिन, बायोमेडिकल वेस्ट मशिन, व्हीजीटिंग चेअर, मल्टीप्यारा मॉनेटर इत्यादी २८ प्रकारचे साधनसामुग्री पुरविण्यात आलेली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून, चौकशी अहवालानुसार, Inj. Ceftriaxone १ gm मुदतबाह्य नव्हते. तसेच Vial वरील स्टिकर बदलण्यात आलेले नाही. उलटी केलेल्या रुग्णांचे उलट्यांचे नमुने रासायनिक विश्लेषकाकडे पाठविण्यात आलेले आहेत. तसेच सदर घटना झाल्यामुळे घटनेच्या दुस-या दिवशी २०० Vial अन्न व औषध प्रशासन विभागाकडे नमुना तपासणीसाठी देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडकी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील मंजुर ग्रामीण रूग्णालयाचे काम सुरू करण्याबाबत

**(५२) * ४१९२ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडकी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथून राष्ट्रीय महामार्ग ७ जात असल्याने तेथे मोठ्या प्रमाणात रस्ते अपघात होत असून जवळपास रूग्णालय नसल्याने नागरीकांच्या आरोग्याकरिता ग्रामीण रूग्णालय मंजुर करण्यात आले असताना सदर रूग्णालयाचे बांधकाम अद्याप सुरू करण्यात आले नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर ग्रामीण रूग्णालय बांधकामाकरिता अद्याप जमीन अधिग्रहन करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ग्रामीण रूग्णालयाच्या बांधकामाकरिता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) होय हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ०६.०८.२०१९ अन्वये मौजे वडकी ता.राळेगाव जि.यवतमाळ येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर करण्यात आले असून रुग्णालय इमारत बांधकामासाठी जमिन अधिग्रहन करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील “वन स्टॉप सेंटर्स” सुरळीतपणे कार्यरत करण्याबाबत

**(५३) * ५७ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांच्या सुरक्षेसाठी केंद सरकारकडून तत्कालीन शासनाला 'निर्भया फंड' अंतर्गत २२६४ कोटी रुपये प्राप्त झालेल्या निधीपैकी केवळ २५२ कोटी रुपयांचा वापर शासनाने केला अाहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अडचणीत सापडलेल्या महिलांना तात्काळ मदत पोहचविण्यासाठी राज्यात “वन स्टॉप सेंटर्स” च्या उभारणीसाठी १४ कोटी ४६ लाख ५४ हजार रुपयांचा निधी व महिला हेल्पलाईन सार्वत्रिकरण करण्यासाठी ६२ लाख ७० हजार रुपयांचा निधी राज्याला केंद्र शासनाने मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य महिला आयोगाने मा.मुख्यमंत्री व महिला व बाल विकास मंत्री यांना सादर केलेल्या अहवालात केंद्र सरकारच्या "वन स्टॉप सेंटर्स" योजनांची राज्यातील परिस्थिती चांगली नसून केंद्रांवर कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यात प्रशिक्षणाचा अभाव असणे,निधीचे वितरण वेळेवर होत नसणे, अयोग्य ठिकाण, अपुरे मनुष्यबळ यामुळे एकही केंद्र दिवसातील २४ तास कार्यान्वित नसल्याचे नमूद करुन कामकाजाची निरीक्षणे, निष्कर्ष व कामगिरी सुधारण्याबाबतच्या शिफारशी देखील शासनास सादर केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने राज्यात राज्य महिला आयोगाने पुण्यातील आयएलएस लॉ कॉलेजच्या स्त्री अध्ययन केंद्राच्या मदतीने अहमदनगर, अकोला, अलिबाग, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नांदेड. नाशिक व सातारा या जिल्ह्यात प्रत्येकी एक आणि पुणे येथे दोन अशी ११ केंद्रे सुरु केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने राज्यातील "वन स्टॉप सेंटर्स" सुरळीतपणे कार्यरत करण्याबाबत तसेच 'निर्भया फंड' चा पूर्णपणे वापर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** : (१) केंद्र शासनाने निर्भया योजनेसाठी मुंबई शहराची निवड केली असून, याकरीता सन २०१८-१९ ते २०२०-२१ या तीन वर्षाकरीता रु.२५२.०० कोटी निधी मंजूर केला आहे. सदर निधीपैकी ६०% निधी केंद्र शासन व ४०% निधी राज्य शासन उपलब्ध करुन देणार आहे. सदर निधीपैकी रु.१००.०० कोटी निधी वापरासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात कार्यादेश देण्यात आले आहेत. उर्वरित निधी खर्च करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) वन स्टॉप सेंटर या योजनेसाठी रु.१५,६४,९८,३३१.०० (रुपये पंधरा कोटी चौसष्ट लाख अठ्याण्णव हजार तीनशे एकतीस फक्त) निधी इतका निधी महाराष्ट्र राज्यासाठी प्राप्त झाला आहे.

(३) नाही.

राज्य महिला आयोगाने सादर केलेल्या अहवालामध्ये वन स्टॉप सेंटर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनंषंगाने शिफारशी केल्या आहेत.

(४) नाही.

वन स्टॉप सेंटर ही केंद्रपुरस्कत योजना असून केंद्र शासनाने राज्यातील ३६ जिल्हयांसाठी ३७ केंद्र मंजूर केलेली आहेत.

(५) केंद्र शासनाच्या निकषानुसार राज्यातील ३६ जिल्हयांसाठी ३७ केंद्र मंजुर करण्यात आली असुन सर्व केंद्रे सध्या कार्यरत आहेत. आयुक्तालयाचे दि.२०.११.२०१९ पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना वन स्टॉप सेंटर योजनेचा जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणेबाबत कळविलेले आहे.

केंद्र पुरस्कृत वन स्टॉप सेंटर या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यातील सर्व ३६ जिल्हयांमध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच १८ जिल्हयांमध्ये ईम्प्लीमेंटीग एजन्सी नियुक्तीबाबतची कार्यवाही सुरु आहे. वन स्टॉप सेंटरच्या इमारतीच्या कायमस्वरुपी बांधकामासाठी २४ जिल्हयांमध्ये शासकीय जमीन उपलब्ध झाली असून उर्वरित जिल्हयांमध्ये शासकीय जमीन उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील वैद्यकीय सेवेंतर्गत सुरु झालेल्या मोटार बाईक रुग्णवाहिका विनावापर पडून असल्याबाबत

**(५४) * ५७० श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आपत्कालीन वैद्‌यकीय सेवेअंतर्गत तीन वर्षापूर्वी सुरु झालेल्या मोटार बाईक रुग्णवाहिका अचलपूर-मेळघाट येथे विनावापार पडून असल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासी पाडयांवर रुग्णवाहिका जाऊ शकत नसल्याने अशा ठिकाणी वैद्यकीय सेवा पोहोचविण्यासाठी रुग्णवाहिका सेवा सुरु करण्यात आली असताना मेळघाटातील पाच बाईक रुग्णवाहिका पैकी चार ठिकाणची सेवा सध्या बंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अचलपूर तालुक्यातील हतरु, कांटकुंभ, हरिसाल, टेंब्रुसोडा या प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश असुन तेथील आदिवासी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन सदरहू सेवा तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेतंर्गत मोटार बाईक रुग्णवाहिका सेवा दि.०२.०८.२०१७ पासून प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली असून सदयस्थितीमध्ये ३० मोटार बाईक रुग्णवाहिकेद्वारे एकूण २६,०४२ रुग्णास सेवा देण्यात आली आहे. अमरावती जिल्हयामध्ये एकूण ५ बाईक रुग्णवाहीका कार्यरत असून माहे नोव्हेंबर, २०१९ पर्यंत एकूण ३४५० रुग्णांना सेवा देण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात विविध औषधांचा असलेला तुटवडा

**(५५) * ७९ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात सातत्याने विविध औषधांचा तुटवडा निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील औषध विभागात काही ठराविक औषधे मिळत असून त्यामध्ये पॅरामिसटामल, डायल्को यासारख्या औषधांचा साठा मोठ्या प्रमाणात आहे परंतु अ‍ॅन्टी बायोटिक तसेच मल्टीबिटामीन पेनकिलर, जेल आदि औषधांचा तुटवडा असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी डीपीडीसीमधून औषध खरेदीकरिता ३ कोटीचा स्वतंत्र निधी मिळूनही औषधांचा तुटवडा असण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने औषधांचा पुरेसा पुरवठा करण्याबाबत शासनाने काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे आवश्यक औषध साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे अत्यावश्यक औषधी तसेच अँटी बायोटिक मल्टीविटामीन, पेनकिलर, जेल इत्यादी औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामखेडा ते शेमळदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) रस्त्याची झालेली दुरवस्था

**(५६) * ३१८७ श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर मतदार क्षेत्रातील (जि.जळगांव) ग्रामसडक योजनेअंतर्गत खामखेडा ते शेमळदा रस्त्याचे काम होऊन अवघे चार महिन्यांचा कालावधी लोटला नसतानाही या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वारंवार संबधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्यांच्या एकुण १२.०५ कि.मी. लांबीपैकी सा.क्र. ०/००० ते ०/६०० या ०.६०० कि.मी. लांबीतील डांबरी पृष्ठभागावर अवजड वाहनाच्या वाहतुकीमुळे काही ठिकाणी खड्डे पडले आहे व उर्वरीत ११.४०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.
(२) हे खरे नाही.

अवजड वाहनाच्या वाहतुकीमुळे खड्डे पडलेल्या ०.६०० कि.मी. लांबीतील दुरूस्तीचे काम प्रगतीत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पॅथॉलॉजिस्टच्या डिजीटल स्वाक्षरीचा अहवाल देणाऱ्या प्रयोगशाळांवर कारवाई करण्याबाबत

**(५७) * ५७९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रयोग शाळांमध्ये पॅथॉलॉजिस्ट उपलब्ध नसल्यास पॅथॉलॉजिस्टची डिजीटल स्वाक्षरी अहवालावर छापण्याचे प्रकार घडत असल्याने यावर नियंत्रण आणण्यासाठी प्रयोग शाळांशी संलग्न असलेल्या पॅथॉलॉजिस्टचा डिजीटल स्वाक्षरी अहवाल देणे अमान्य असल्याचा निर्णय राज्य वैद्यकीय परिषदेने दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॅथॉलॉजी विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या नोंदणीकृत पॅथॉलॉजिस्ट ने प्रयोग शाळांमधील अहवाल प्रमाणित करणे बंधनकारक असल्याचा आदेश माहे डिसेंबर, २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला असतानाही राज्यात अनेक ठिकाणी पॅथॉलॉजिस्टच्या अनुपस्थितीत तंत्रज्ञ स्वतःच्या सहीने रुग्णांना अहवाल देत असुन महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट संघटनेने बेकायदा प्रयोग शाळाबाबत अनेकदा शासनाकडे तक्रारही केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात केवळ २१६१ रोगनिदान तज्ञ (पॅथॉलॉजिस्ट) उपलब्ध असून त्यापेक्षा जास्त प्रयोगशाळा हया बेकायदेशिरपणे सुरु असल्याचे शासनाने सन २०१९ मध्ये मान्य केलेले असतानाही अद्याप या प्रयोगशाळांवर शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन डिजीटल स्वाक्षरीचा अहवाल देणाऱ्या व बेकायदेशिरपणे सुरु असलेल्या प्रयोगशाळांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) नाही.

(२) महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजी संघटनेचे रोगनिदान चाचण्या अहवाल प्रमाणिकरण पॅथॉलॉजिस्टच्या नियंत्रणाखाली व स्वाक्षरीने देण्यासाठी निर्देश देणे तसेच पॅथॉलॉजिस्ट एका पेक्षा जास्त प्रयोगशाळेत उपस्थित न राहता रोगनिदान अहवाल प्रमाणित करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) सद्यास्थितीत राज्यात ३१४३ रोगनिदान तज्ञ नोंदणीकृत आहेत.

(४) लागू नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करडी धरणाच्या बॅकवॉटर व ओव्हरफ्लोमुळे धाड धामणगाव आणि धाड कुंबेफळ रस्ता बंद होत असल्याबाबत

**(५८) * १७७३ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाड धामणगाव रस्त्यावरील धाड (ता.जि.बुलढाणा) या गावाजवळ असलेला जुना सिमेंट पाईपचा पूल मोडकळीस आला असुन ज्या नदीवर हा पूल आहे त्याच नदीवर जलसंपदा विभागाने करडी धरण बांधले असल्याने हृया करडी धरणाचे बॅक वॉटरमुळे पावसाळ्यात अनेकदा धाड धामणगाव रस्ता बंद होतो. तसेच हृया धरणाच्या भिंतीखाली धाड कुंबेफळ हा रस्ता असून करडी धरणाच्या ओव्हर फ्लोच्या पाण्याने हा रस्ता देखील बंद होऊन अनेक गावांचा संपर्क तुटतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करडी धरणाच्या धाड धामणगाव रस्त्यावर तसेच धाड कुंबेफळ रस्त्यावर दोनही ठिकाणी पुलांचे बांधकाम करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याअनुषंगाने करडी धरणाच्या धाड धामणगाव रस्त्यावर तसेच धाड कुंबेफळ रस्त्यावर पुलांचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) धाड धामणगाव रस्त्यावरील पूल करडी धरणाच्या उर्ध्व बाजूस ३४०१ मी. अंतरावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात आलेला आहे. पुलाची माथा पातळी ही धरणाचे पूर पातळीपेक्षा ०.९५ मी.जास्त आहे. त्यामूळे सदर पूल धरणांच्या बॅकवॉटर मुळे बाधित होत नाही. तसेच धाड-कुंबेफळ रस्त्यावरील पूल हा करडी धरणाच्या अधो बाजूस १५१४ मी. अंतरावर जिल्हापरिषद बुलढाणा यांचेकडून बांधण्यात आलेला आहे. धरणातील ओव्हरफ्लो चे पाणी पावसाळ्यात कधी कधी या पूलावरुन वाहते.

(२) होय.

(३) सद्य:स्थितीत पारध-धामणगाव-धाड-सावळी-चिखली राज्यमार्ग २१४ सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मार्च २०२० च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तसेच धाड-कुंबेफळ ग्रामीण मार्ग ५६ रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत नवीन पुलाचे बांधकाम मार्च २०२० मध्ये नाबार्ड अर्थसहाय्य अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कलाकारांच्या वारसदारांना कलाकार मानधनाची थकीत फरकाची रक्कम मिळणेबाबत

**(५९) * ६८९ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कलाकारांना त्यांच्या वृध्दापकाळात उदरनिर्वाहासाठी शासनामार्फत मंजूर असलेल्या कलाकार मानधनाचा लाभ त्यांच्या मृत्युनंतर वारसदारांना लागू असून कलाकाराच्या मृत्युच्या दिनांकापासून ते वारसांना मानधन लागू झालेल्या दिनांकापर्यंतच्या थकीत मानधनातील फरकाबाबतचा प्रस्ताव संचालक, सांस्कृतीक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर थकीत फरकाची रक्कम कलाकारांच्या वारसांना तात्काळ अदा करण्यात यावी अशी मागणी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी मा.सांस्कृतीक कार्य मंत्री यांच्याकडे दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१५-१६ ते २०१८-१९ पर्यत वृध्द कलावंत मानधन समितीने निवड केलेल्या २४० लोककलावंताचे रखडलेले मानधन सुरु करणेबाबत शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजनेतंर्गत मयत झालेल्या कलाकारांच्या वारसदारांचे वारस दावे पडताळून त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात अनेक प्रकरणी जिल्हा परिषद स्तरावर कालावधी व्यतित झाला आहे. वारस विषयक आदेश संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर वारसदारांस नियमित मानधन सुरू करण्यात आले आहे. मात्र थकबाकी रक्कमेचे दावे १ वर्षाहून अधिक काळ प्रलंबित असल्याने ते मंजूर करण्याचे अधिकार प्रशासनिक विभागास आहेत. संचालकाकडून असे प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही सुरू असून शासन मंजूरीनंतर थकीत मानधनातील फरकाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(२) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजनेअंतर्गत बुलडाणा जिल्हयातील सन २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीसाठी संबंधित वृध्द कलावंत मानधन समितीने मंजुर केलेल्या एकूण १८० लोककलावंतांची यादी दि. १ मार्च २०१९ रोजी तर सन २०१८-१९ या कालावधीकरिता मंजूर केलेल्या ६० लोककलावंतांची यादी सांस्कृतिक कार्य संचालनालयास दिनांक २९ मार्च, २०१९ रोजी प्राप्त झालेली आहे.

तथापि, सदर मंजूर यादीसोबत निवड केलेल्या कलावंतांचे बँकेचे पासबुक व इतर तपशील नसल्याने, जिल्हा परिषद बुलडाणा यांना पासबुक व इतर तपशील उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. जिल्हा परिषद बुलडाणा यांच्याकडून दिनांक २९ नोव्हेंबर, २०१९ रोजी कलावंतांचे पासबुक व माहिती संचालनालयास प्राप्त झालेली आहे. सद्य:स्थितीत विभागाकडे माहे डिसेंबर, २०१९ पासून या योजनेकरिता निधी उपलब्ध नसल्यामुळे या सर्व मंजूर कलावंतांना मानधन अदा करण्यात आलेले नाही. याबाबतची पुरवणी मागणी वित्त विभागास सादर करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कार्ला (ता.मावळ, जि.पुणे) येथील एकविरा गडावर सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६०) * १६७० श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या कार्ला (ता.मावळ, जि.पुणे) येथील एकवीरा देवीच्या गडावर सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात याबाबतचे निवेदन दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना देवस्थानाच्या अध्यक्षांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने कार्ला येथील एकविरा देवीच्या गडावर सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विभागाचा शासन निर्णय क्र.तीर्थवि-२०११/प्र.क्र.६५१/योजना-७, दिनांक १६ नोव्हेंबर २०१२ अन्वये ब वर्ग दर्जा देण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना दि.१३/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच, सदर तीर्थक्षेत्रास यापूर्वी क वर्ग दर्जा देण्यात आला असून रु.२०.०० लक्ष रक्कमेची कामे पूर्ण असून रु.१०.०० लक्ष रक्कमेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिकोत्रा (जि.कोल्हापूर) नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(६१) * ३९३४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील चिकोत्रा नदीवरील कोल्हापूर पध्दतीचे २९ बंधारे नादुरूस्त असून यातील ३ बंधारे पुरामध्ये वाहून गेले असल्याने त्यांची दुरूस्ती करण्याची मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये आलेल्या महापुरामुळे चिकोत्रा नदीवरील सर्वच बंधारे नादुरूस्त झाले असून त्यामध्ये पाणी साठवणूक होत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिकोत्रा नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्या येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे नाही.

चिकोत्रा नदीवर चिकोत्रा मध्यम प्रकल्प असून त्या अंतर्गत २९ को.प.बंधारे आहेत. यापैकी ऑगस्ट, २०१९ मध्ये महापुरामुळे १३ को.प.बंधाऱ्यांचे नुकसान झालेले आहे. तथापि, कोणताही बंधारा वाहून गेलेला नाही.

तसेच स्थानिक शेतकऱ्यांनी क्षेत्रिय कार्यालयाकडे बंधारे दुरूस्ती करण्याची मागणी केलेली नाही.

(२) अंशत: खरे नाही.

वरीलप्रमाणे १३ को.प.बंधाऱ्यांच्या झालेल्या नुकसानीच्या दुरूस्तीस महामंडळाने मान्यता देऊन कामांना निधी उपलब्ध करून दिला आहे. सदर दुरूस्ती कामे पूर्ण झालेली असून सद्य:स्थितीमध्ये पाणी साठवणूक करण्यात येत आहे.

(३) वरीलप्रमाणे नुकसान झालेल्या १३ को.प.बंधाऱ्यांची दुरूस्ती कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तिवरे धरण (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) फुटीमुळे ग्रामस्थांचा झालेला मृत्यु

**(६२) * १९०४ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवरे धरण (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे माहे जुलै, २०१९ च्या पहिल्या आठवडयात धरण फुटल्याची दुर्घटना घडली असून या दुर्घटनेत २३ ग्रामस्थांचा मृत्यु झालेला असतांना २३ माणसे वाहून गेली आहेत तसेच तेथील १३ घरेही वाहून गेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासंदर्भात शासनाने नेमलेल्या एसआयटीने आपला अहवाल तीन महिन्यापूर्वीच शासनास सादर केला असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकरणाधिन अहवाल अद्याप खुला न करण्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसास व अन्य नुकसान झालेल्यांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) हे अंशत: खरे आहे.

तिवरे धरणफुटी दुर्घटनेत एकुण २२ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या असुन त्यापैकी २१ मृतदेह प्राप्त झाले आहेत. तसेच तिवरे भेंदवाडी गावातील नदी किनारी असणारी १५ घरे, १३ गोठे व १ पोल्ट्री वाहून गेली आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

याप्रकरणी नेमलेल्या विशेष चौकशी पथकाने दिनांक ०६/०२/२०२० अन्वये सादर केलेला अहवाल शासनास दिनांक ११/०२/२०२० रोजी प्राप्त झालेला असुन सदर अहवालाची छाननी करण्यात येत आहे.

(४) सदर दुर्घटनेतील २१ मृत व्यक्तींपैकी १८ मृतांच्या वारसास प्रत्येकी रु.६.०० लाख याप्रमाणे एकुण रु.१०८.०० लाख मदत देण्यात आली आहे. उर्वरित ३ मृतांपैकी १ मृताचे वारस प्रमाणपत्र व २ मृतांचे अज्ञान पालनकर्ता प्रमाणपत्र न्यायालयाकडून घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर दुर्घटनेत पुर्णत: वाहून क्षतीग्रस्त झालेल्या ४४ कुटुंबांना कपडे नुकसानीसाठी प्रती कुटुंब रु.२५०० व घरगुती भांडी/वस्तु नुकसानीकरिता प्रती कुटुंब रु.२५०० याप्रमाणे एकुण रु.२.२० लाख अदा करण्यात आले आहेत. तसेच क्षतीग्रस्त प्रती प्रौढ व्यक्तीस रु.६०/- व प्रती बालकास रु.४५/- याप्रमाणे एकुण १२५ प्रौढ व २२ बालकांना एकुण ३० दिवसाचा दैनिक भत्ता म्हणुन रु.२,५४,७००/- मदत देण्यात आली आहे. याबरोबरच मृतदेह सापडलेल्या जनावरांच्या मालकांना रु.१.०३ लाख व इतर बेपत्ता जनावरांच्या मालकांना रु.२.३१ लाख असे एकुण रु.३.३४ लाख मदत देण्यात आली आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडुन रु.२.६० लक्ष इतकी रक्कम बाधित २६ कुटुंबांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे रोख मदत अदा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हयातील जुन्या व मोडकळीस आलेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठी घालण्यात आलेल्या अटी शिथिल करण्याबाबत

**(६३) * ६७१ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हयातील जुन्या व मोडकळीस आलेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठी तयार केलेल्या प्रचलित नियमांत घरांच्या पुनर्बांधणीसाठी बिनशेती, सात-बारा उताऱ्यातील इतर सह-हिस्सेदारांची संमतीपत्रे व इतर

अटी कायम ठेवल्याने या दोन जिल्हयातील जुन्या व मोडकळीस आलेल्या घरांची पुनर्बांधणी रखडली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन जिल्हयात जुन्या व मोडकळीस आलेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठी घालण्यात आलेल्या जाचक अटी शिथिल करण्याबाबत मागणी लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हयातील जुन्या व मोडकळीस आलेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठी घालण्यात आलेल्या जाचक अटी शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशतः हे खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयात जून्या व मोडकळीस आलेल्या घरांची पुर्नबांधणी रखडलेली असल्याचे निदर्शनास आली आहे. तथापि रत्नागिरी जिल्हयात घरांची पुनर्बांधणी रखडली असल्याचे दिसुन येत नाही.
(२) व (३) होय.

दिनांक-१८.०२.२०२० रोजी मा. मंत्री ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण भागातील घर बांधणी परवाणगी बाबत सुसूत्रता आणण्याच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली असुन, त्यानुसार महाराष्ट्र ग्राम पंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम २०१४, मध्ये आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयाच्या कार्डिओलॉजी विभागाकडून स्टेंटसाठी जादा दर आकारणी करण्यात येत असल्याबाबत

**(६४) * ८८८ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदयविकारावरील उपचारासाठी वापरण्यात येणा-या स्टेंटच्या किंमती निर्धारित केलेल्या असतानाही मुंबईतील जे.जे. रुग्णालयाच्या कार्डिऑलॉजी विभागाकडून परस्पर मनमानीपणे स्टेंटसाठी दर आकारणी करुन रुग्णांची लुट करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले आरोग्य योजनेमधील गोरगरीब रुग्णांनाही खासगी कंपन्याकडून स्टेंट विकत घ्याव्या लागत असल्याने रुग्णांना नाहक अतिरिक्त भुर्दंड पडत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मागील दोन वर्षापासून दोनपेक्षा अधिक स्टेंट लागत असलेल्या अनेक रुग्णांकडून तिसऱ्या व चौथ्या स्टेंटसाठी अतिरिक्त पैसे घेत असल्याच्या तक्रारी करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद व बीड जिल्हयातील ऊसतोड करणाऱ्या महिलांचे गर्भाशय काढून टाकल्याबाबत

**(६५) * १२ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर**

**पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.निलेश लंके (पारनेर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बीड जिल्ह्यात ऊस तोडणीला जाणाऱ्या महिला कामगारांचे 'आशा' सेविकांमार्फत ८२ हजार ९०० महिलांचे आरोग्य सर्वेक्षण करण्यात आले असता, १३ हजार ऊसतोडणी महिला कामगारांच्या शस्त्रक्रिया करुन गर्भपिशव्या काढण्यात आले असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊसतोडणी महिला कामगारांना विविध आजाराची भिती दाखवून सदर शस्त्रक्रिया बीड जिल्ह्यातील १० खासगी रुग्णालयांमध्ये करण्यात आल्या असल्याचेही उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील उसतोड करणाऱ्या महिलांच्या बाबतीत गर्भधारणेच्या काळात ऊस तोडणीच्या कामावर जाऊ शकत नसल्यामुळे रोजगार बुडत असल्याने ३० हजार महिलांनी गर्भाशय काढून टाकले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत तसेच उसतोड करणाऱ्या महिलांना गर्भधारणेच्या काळात रोजगाराची हमी देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.

बीड जिल्ह्यातील उसतोडणीकरीता जाणाऱ्या एकूण ८२,३०९ महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यापैकी १३,६८१ महिलांच्या गर्भपिशवी काढण्याच्या शस्त्रक्रिया विविध वैद्यकीय कारणास्तव संबंधीत महिलेच्या व तीच्या कुटुंबाच्या सहमतीने झालेल्या आहेत.

(३) होय, हे अंशतः खरे आहे.

औरंगाबाद जिल्हयातील शासकीय संस्थांमध्ये माहे एप्रिल, २०१९ ते डिसेंबर, २०१९ अखेर एकूण १३७७ गर्भपिशव्या काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत त्यापैकी खाजगी रुग्णालयात १२०३ व शासकीय रुग्णालयात १७४ शस्त्रक्रिया झाल्या आहेत. औरंगाबाद जिल्हयात उसतोड महिलांवर उक्त शस्त्रक्रिया झाल्याबाबत सर्वेक्षण झालेले नाही.

(४) बीड जिल्हयासंदर्भात विधानपरिषद उपसभापती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीने केलेल्या चौकशीत तथ्य आढळून आले नसल्याने वैद्यकीय व्यावसायिक अथवा रुग्णालयांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌ववत नाही.

केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध कामगार कायद्याप्रमाणे उसतोड कामगारांना किमान वेतन व सुविधा पुरविण्याबाबत साखर आयुक्त यांना व व्यवस्थापकीय संचालक, साखर कारखाना यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे (ता.खेड) व मौजे आबलोली (ता.गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(६६) * १२९४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे (ता.खेड) आणि मौजे आबलोली (ता.गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयांचा दर्जा उन्नतीकरण करून बृहत आराखडयात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे माहे जुलै-ऑगस्ट २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने मान्य केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्राथमिक आरोग्य केद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन अदयाप झाले नसल्याने स्थानिक ग्रामस्थ तसेच लोकप्रतिनिधी यांच्याकडून सातत्याने पत्राद्‌वारे मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालय स्तरावरुन सुरु असून मौजे वावे (ता.खेड) आणि मौजे आबलोली (ता.गुहागर) येथे नवीन ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किनगाव (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबत

**(६७) * ७७१ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनगाव (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असून दिवसेंदिवस या केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत असून रुग्णांना अत्यावश्यक रूग्ण सुविधा मिळणे आवश्यक असतानाही अनेक दिवसांपासून ग्रामीण रुग्णालयाचा प्रस्ताव मंजूरीविना प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किनगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात व्हावे याबाबतचा प्रस्ताव ई जिल्हा आरोग्य प्रशासनाकडून राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आला असून अद्‌याप त्या प्रस्तावास शासनाची मंजूरी व निधीही मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नविन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या स्तरावर सुरु असून मौजे किनगाव, ता.अहमदपूर, जि.लातूर येथे नविन ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात जलसंधारण विभागाच्या योजनांमधून सिंचन क्षमता वाढविण्याबाबत

**(६८) * ९७ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयात जलसंधारण विभागाच्या ० ते १०० व १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ६७२ योजना पूर्णत्वास असून २५ योजना प्रगतीपथावर आहेत व त्यासाठी अंदाजे साडेसोळा कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनांमधून सुमारे ५ हजार ४२१ हेक्टर सिंचन क्षमता अपेक्षित असताना प्रत्यक्ष १ हजार ९८३ हेक्टर सिंचन होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोटयावधी रुपये खर्च करुनही सिंचन क्षमतेचे लक्ष गाठण्यास अपयशी झाल्याने याबाबतची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त योजनांमधून सिंचन क्षमता वाढावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) हे अंशत: खरे आहे.

यामध्ये ६७२ योजनांपैकी ४ पाझर तलाव, ९ साठवण तलाव, ५ को.प. बंधारे व प्रामुख्याने ६५४ सिमेंट नाला बांध या प्रकारच्या जलसंधारणाच्या भुजलाचे पुर्नभरणाच्या उपचाराचा समावेश आहे.
(२) व (३) हे अशंत: खरे आहे. नैसर्गिक हवामानातील बदलामुळे सतत पर्जन्यमानाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी व अनिश्चित होत असल्याने यवतमाळ जिल्हयात सुध्दा मागील २-३ वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाले. अल्प पावसामुळे पुर्ण क्षमतेने अपेक्षित पाणीसाठा होऊ शकला नाही. त्यामुळे वेळोवेळी उपलब्ध असलेल्या पाणीसाठयातुन पिण्याचे पाण्याचे सोईकरिता नियोजन ठेवून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सिंचन, पावसाचे खंड कालावधीत पिकांना संरक्षीत सिंचनाची सोय उपलब्ध करुन दिल्याने प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सिंचन १९८३ हेक्टर झाले आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण चांगले झाल्यामुळे पाणीसाठा समाधानकारक ८० ते ९० टक्के झाला असुन त्यामुळे यावर्षी होणा-या प्रत्यक्ष सिंचनात निश्चितच वाढ होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मानोरा (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अत्याधुनिक उपकरणांसह जनतेच्या सेवेस रूजु करण्याबाबत

**(६९) * २७९२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा (ता.बल्लारपूर जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अत्याधुनिक उपकरणांसह जनतेच्या सेवेस रूजु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे
(२) प्राथमिक आरोग्य केंद्र, मानोरा ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर येथील इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून शासन निर्णय दि.०९.८.२०१९ अन्वये पदनिर्मिती करण्यात आलेली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, मानोरा येथे नियमित वैद्यकिय अधिकारी नियुक्त होईपर्यंत कंत्राटी वैद्यकिय अधिकारी नियुक्तीची कार्यवाही सुरु असून इतर पदांवर प्रतिनियुक्ती करुन प्राथमिक आरोग्य केंद्र, मानोरा जनतेच्या सेवेस सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

तसेच जिल्हा निधीअंतर्गत अत्यावश्यक यंत्रसामुग्री, साहित्य व फर्निचर खरेदीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दाभा (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) परीसरातील दाभा ते कु-हेगांव रस्त्याच्या कामाबाबत

**(७०) * ४१९३ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाभा (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) परीसरातील दाभा ते कु-हेगांव रस्त्यावर मागील ब-याच वर्षापासुन रस्ता बांधकामाकरिता निधी मंजुर नसल्याने रस्त्यावर जागोजागी खड्डे पडुन संपुर्ण रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नागरीकांना रस्त्यावरुन प्रवास करणे अडचणीचे होत असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दाभा ते कु-हेगाव या रस्ता बांधकामाकरिता शासनाकडून निधी उपलब्ध करून रस्ता दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व सदर निधी कधीपर्यंत देण्यात येईल,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) दाभा कुऱ्हेगांव हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२७ असून या रस्त्याची एकूण लांबी ४.५० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते २/०० कि.मी. रस्ता सुस्थितीत आहे. उर्वरीत लांबीपैकी २/०० ते ३/०० कि.मी. लांबीतील रु.८.२५ लक्षचे रस्ता दुरुस्तीचे काम लेखाशिर्ष ३०५४-२४१९ गट-अ अंतर्गतसन २०१८-१९ मध्ये मंजूर असून प्रगतीपथावर आहे. उर्वरीत रस्ता दुरुस्तीचे काम सन २०१९-२० मध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## अमरावती शहरातील सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलच्या प्रलंबित प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत

**(७१) * ५७४ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहरातील सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये निधी अभावी सेंट्रल ऑक्सीजन थिएटर सुरु करणे शक्य नसल्याने या हॉस्पीटलमधील कॅन्सर, निरोसर्जरी व हृदयशस्त्रक्रिया विभाग व कॅथलॅब बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी निधी उपलब्ध करुन सदर हॉस्पीटल अद्ययावत करण्याबाबतचा ५ वर्षापूर्वी शासनाकडे पाठविण्यात आलेला प्रस्ताव अदयाप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाला मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती टप्पा २ इमारतीमध्ये सेंट्रल ऑक्सीजन सिस्टीम नायट्रस ऑक्साईड तसेच एअर व सेंट्रल सक्शन सिस्टम बसविण्याच्या कामास शासन निर्णय दि.०८.०१.२०१९ अन्वये रु.५३९.०२ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर कामास आगामी अधिवेशनामध्ये निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्नाटक राज्यात वाहून जाणारे कृष्णा नदीतील अतिरिक्त पाणी भिमा खोऱ्यातील दुष्काळी भागात वळविण्याबाबत

**(७२) * ९५६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी पावसाळ्यात कर्नाटक राज्यात वाहून जाणारे कृष्णा नदीतील अतिरिक्त ११५ टी.एम.सी. पाणी अडवून भिमा खोऱ्यातील दुष्काळी भागात वळविण्यासाठी राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजनेच्या प्रकल्पास मान्यता देऊनही अद्याप सदरहू प्रलंबित प्रकल्पाचे काम सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ५००० कोटीच्या प्रकल्पास प्रदिर्घ विलंब झाल्याने या प्रकल्पाचा खर्च १५००० कोटी पर्यंत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रलंबित कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजनेच्या प्रकल्पाच्या कामास प्रदिर्घ विलंब लागण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकल्प विनाविलंब वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाच्या (लिंक १ ते ५) पैकी कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी तांत्रिकदृष्टया आवश्यक असलेली लिंक-५ अंतर्गत उध्दट बॅरेज व नीरा-भीमा जोड बोगदा ही कामे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत प्रगतीपथावर आहेत.

(२) कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता किंमत (दरसूची वर्ष २००२-०३) रु.४,९३२ कोटी इतकी आहे. त्यानंतर प्रकल्पाची अद्यावत किंमत काढण्यात आली नाही. तथापि कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्प लिंक-५ अंतर्गत उध्दट बॅरेज व नीरा-भीमा जोड बोगदा या घटक कामाची मंजुर प्र.मा. किंमत रु.५२६.६७ कोटी व अद्यावत किंमत रु.११७५.६३ कोटी आहे.

(३) व (४) i. पहिल्या कृष्णा पाणी तंटा लवाद निर्णयानुसार महाराष्ट्राच्या वाटयाला आलेल्या पाणी वापराच्या नियोजनात या प्रकल्पाचा समावेश नाही.

ii. दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादच्या निर्णयामध्ये लवादाने घातलेल्या अटीनुसार कृष्णा खोऱ्यातील पाणी एका उपखो-यातून दुसऱ्या उपखोऱ्यात वळविण्यास मनाई केली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या लिंक १ ते ४ ची कामे करणे शक्य झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर जिल्हा परीषदेने जिल्हयातील शाळांसाठी खरेदी केलेल्या सतरंज्याचे वाटप केले नसल्याबाबत

**(७३) * ४३१३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर, जिल्हा परीषदेने माहे मार्च, २०१९ मध्ये जिल्हयातील १९९४ शाळांसाठी राज्य हातमाग सहकारी संस्थेकडून सतरंज्या खरेदी करुनही शेकडो शाळांना अदयाप सतरंज्याचा पुरवठा झाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू शाळांना सतरंज्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि निगडीत रुग्णालयांमधील प्रशासकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७४) * ११५९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आणि त्यांच्याशी निगडीत रुग्णालयांत प्रशासकीय अधिकाऱ्यांची ५५ पदे मंजूर असून सद्य:स्थितीत केवळ २४ पदे भरलेली असून तब्बल ३१ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रशासकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) सदरहु रिक्त पदे सरळसेवेने तसेच पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## परळ (मुंबई) येथील वाडिया रुग्णालय बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(७५) * १४ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास**

**कोळंबकर (वडाळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन आणि महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या अनुदानावर बृहन्मुंबईतील परळ (मुंबई) येथील वाडिया रुग्णालय चालविले जात असून प्रसुती व बालरोगावर अत्याधुनिक आणि परवडणाऱ्या दरात उपचार देणारे ते एकमेव रुग्णालय शहरात उपलब्ध असल्याने दररोज ५०० बालके तसेच ३५० गरोदर माहिला येथे उपचारासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ वर्षापूर्वी महानगरपालिकेने रुग्णालयाच्या वैद्यकीय खर्चामध्ये घोळ असल्याचा ठपका ठेवत सदर रुग्णालयांना देण्यात येणारे अनुदान बंद केले होते व शासनानेही अनुदान दिलेले नसल्याने परिणामत: थकीत अनुदानामुळे आता कोणतीही वैद्यकीय सेवा देणे शक्य नसल्याची भूमिका स्पष्ट करत रुग्णालय प्रशासनाने बालकांवर उपचार करणारे बाई जेरबाई वाडिया आणि प्रसुतीसाठीचे नौरोजी वाडिया ही दोन्ही रुग्णालये बंद करण्याचे जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाडीया रुग्णालय प्रशासनाने अतिरिक्त कामगार भरती, काही वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना दुबार वेतन करारानुसार १२० खाटापेक्षा अधिक १२६ खाटा महानगरपालिका प्रशासनाला विचारात न घेता वाढविल्यामुळे तसेच रुग्णालयाला दिल्या जाणाऱ्या निधीचे ऑडीट केले गेले नसल्यामुळे सदरची परिस्थिती निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुमारे ३०० हून अधिक रुग्णांना घरी सोडले असून शस्त्रक्रियापासून बाह्यरुग्णापर्यंत सर्व विभाग हळूहळू बंद करण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरु केली असल्याची बाब दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बाई जेरबाई वाडिया रुग्णालयाचे ३० कोटी आणि नौरोजी वाडिया रुग्णालयाचे १०५ कोटी असे सुमारे १३५ कोटी रुपये महानगरपालिकेकडे थकित आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच सदरहू दोन्ही रुग्णालयातून पूर्ववत नियमित आरोग्य सेवा अखंडपणे सुरु राहण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच बृन्हमुंबई महानगरपालिकेकडून वेळोवेळी अनुदान वितरीत करण्यात येत आहे. तसेच दोन्ही रुग्णालय सुरळीत चालू आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) शासन निर्णय दिनांक ०८ मार्च, २०१९ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १६.०१.२०२० अन्वये नौरोसजी वाडिया मॅटर्निटी रुग्णालयास तात्काळ रु.२४

कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच, डिसेंबर, २०१९ पर्यंत सन २०१० मध्ये शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे महानगरपालिकेमार्फत देय असलेले अनुदान अदा करण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोयना धरणाचे वाहून जाणाऱ्या अवजलाचा वापर सिंचन व पाणी पुरवठयासाठी करण्याबाबत

**(७६) * १३८५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात दरवर्षी सुमारे ३५०० मि.मी. पाऊस पडूनही माहे फेब्रुवारीपासून ते पाऊस पडेपर्यंत सुमारे पाच ते सहा महिने अनेक ठिकाणी पाणी टंचाईची भीषण परिस्थिती निर्माण होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोयना धरणातील सुमारे ६७.५० अब्ज घनफूट पाणी विजनिर्मितीनंतर चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील वाशिष्ठी नदीमध्ये सोडण्यात येत असून हे सर्व पाणी समुद्राला जावून मिळते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोयनेचे वाहून जाणाऱ्या अवजलाचा वापर सिंचन व पाणीपुरवठयासाठी करण्याबाबत महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुसार या प्रकल्पाचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.
(२) अंशतः खरे आहे.
कोयना धरणातील सुमारे ६७.५० अब्ज घनफूट पाणी वीजनिर्मितीनतंर वाशिष्ठी नदीमध्ये सोडण्यात येते. यापैकी २.४६ अ.घ.फू. पाण्याचे सिंचन व बिगर सिंचनासाठी पाणी आरक्षण आहे. उर्वरीत पाणी समुद्रास जावून मिळते.

(३) रत्नागिरी जिल्ह्यातील वाशिष्ठी नदीमध्ये कोयना धरणातून वीज निर्मीती नंतर उपलब्ध होणारे ६७.५० अ.घ.फूट पाणी सिंचन व बिगर सिंचनासाठी वापरात आणण्याच्या दृष्टीने विविध विभागामार्फत अभ्यास प्रगतीपथावर असून, सदर अभ्यासाच्या निष्कर्षांवरून प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय घेणेत येईल.

कोयना अवजलाचा वापर रत्नागिरी, सिंधुदुर्ग,रायगड, पालघर व ठाणे जिल्हातील सिंचन क्षेत्रासाठी तसेच मुंबई शहराच्या पाणी पुरवठयासाठी करण्याचे दृष्टीने प्रकल्प राबविणेसाठी अभ्यास करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.